पाक्षिक
# मनोगत
प्रदेश बीजेपी

मुंबई ● वर्ष: 7 ● अंक: 5 ● 1 मार्च, 2025 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.









# सदस्य नोंदणी महाअभियान







## अध्यक्षीय मनोगत

# कदम मिला कर चलना होगा

भारतीय जनता पार्टीचे महान संस्थापक नेते, माजी पंतप्रधान, श्रेष्ठ कवी, ओजस्वी वक्ता, प्रभावी प्रशासक, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांची जन्मशताब्दी आपण साजरी करत आहोत. अटलजींच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू होते. त्यांनी देशसेवेमध्ये अतुलनीय योगदान दिले आहे. काँग्रेसची एकपक्षीय राजवट संपवून त्यांनी भारतीय जनता पार्टीचा समर्थ पर्याय देशाला दिला. असंख्य आव्हानांवर मात करत त्यांनी प्रथम जनसंघाचे आणि नंतर भारतीय जनता पार्टीचे नेतृत्व केले. आज भाजपा जगातील सर्वात मोठा पक्ष झाला आहे आणि मोदीजींच्या नेतृत्वात पुन्हा पुन्हा विजयी होत आहे. पक्षाच्या या यशाचा पाया अटलजींनी लालकृष्ण अडवाणीजींच्या साथीने घातला आहे. अटलजींनी शून्यातून पक्ष उभा करून त्याला देशातील सत्ताधारी पक्ष बनविला. तोपर्यंत केवळ काँग्रेसने देशावर राज्य करावे अशी एकपक्षीय राजवट देशात होती. अटलजींनी भाजपाचा पर्याय उभा केला, भाजपाचे नेतृत्व करताना आघाडी सरकार यशस्वी करून दाखविले आणि त्यामुळे देशाची लोकशाही अर्थपूर्ण झाली. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीत देशाने विकासाच्या मार्गावर भक्कम पावले टाकली. त्यांनी अणुचाचणीचा धाडसी निर्णय घेतला आणि त्याचप्रमाणे देशात महामार्गांचे जाळे विणण्यासाठी ऐतिहासिक कामगिरी केली. पंतप्रधान म्हणून अटलजींची कारकिर्द ऐतिहासिक होती. त्यांच्याविषयी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिहिलेला लेख मनोगतच्या या अंकात आहे, तो कार्यकर्त्यांनी अवश्य वाचावा. अटलजी महान कवी होते. त्यांनी लिहिलेल्या अनेक कविता गाजल्या. त्यांच्या कवितांपैकी 'कदम मिला कर चलना होगा' या कवितेची आज एका वेगळ्या संदर्भात आठवण होते. अटलजींनी कवितेत म्हटले होते,

*कदम मिला कर चलना होगा*
*बाधाएँ आती है आएँ, घिरें प्रलय की घोर घटाएँ, पावों के नीचे अंगारे,*
*सिर पर बरसें यदि ज्वालाएँ, निज हाथों से हँसते-हँसते,*
*आग लगा कर जलना होगा। कदम मिलाकर चलना होगा।*

अटलजींनी एका अत्यंत आव्हानात्मक आणि कठीण काळात पक्ष उभा केला. त्यांच्या नेतृत्वात पक्षाच्या लाखो कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम केले, असंख्य संकटांवर मात केली आणि देशसेवेसाठी यश मिळविले. आज भाजपा सातत्याने निवडणुका जिंकत आहे आणि केंद्र सरकारसह अनेक राज्यात भाजपाचे सरकार आहे. तरीही आपल्याला अटलजींचा हा संदेश ध्यानात ठेऊन काम करायचे आहे. सत्ता आली, अनुकुलता आली तरीही आपण संघर्ष विसरायचा नाही. आपण सातत्याने साधना करत राहू तरच आपले यश टिकेल आणि वाढेल. भाजपाचे सदस्यता अभियान यशस्वीपणे चालू आहे. समाजाच्या सर्व घटकातील लोक भाजपाशी जोडले जाण्यास उत्सुक आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पक्षाचे सर्व नेते आणि कार्यकर्ते सदस्यता अभियानासाठी काम करत आहेत. राज्यात भाजपाने एक कोटी सदस्यसंख्या ओलांडली आहे. दीड कोटी संख्येकडे आपली वाटचाल सुरू आहे. आपल्याला पक्षकार्यात सर्वांना जोडून घ्यायचे आहे आणि त्याचबरोबर एकजुटीने काम करायचे आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर–वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

नमो किसान सन्मान निधी ३ हजार रु. नी वाढविणार ........ ०८



आंतरराष्ट्रीय परीप्रेक्ष्यात नरेंद्र मोदी ........ १२



‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ अभियानाने दशकभरात घेतली उंच भरारी ........ १७



राष्ट्र उभारणीच्या ‘अटल’ आदर्शाची शताब्दी ........ १८



चीन प्रेमाचा काँग्रेसी उमाळा ........ २४



२० लाख लाभार्थ्यांना एकाच वेळी घरकुल मंजुरीचे पत्र ........ ३०



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई –२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२–२२०२२०५०

# सदस्य नोंदणी महाअभियान

● **रवींद्र अनासपुरे,** मुख्यालय प्रभारी-प्रदेश भाजपा

> भारतीय जनता पार्टी हा 'संघटना प्रधान' पक्ष आहे. आपल्या संघटनेत पक्षांतर्गत लोकशाहीला मोठे महत्व आहे. याचसाठी आपण 'संघटन पर्व' उपक्रम अंमलात आणतो. केवळ सत्ता, सरकार हे आपले उद्दिष्ट नाही. पक्षाची ध्येयधोरणे, विचारसरणी सामान्य माणसांपर्यंत पोहचवणे याला आपल्या संघटनेत सर्वोच्च प्राधान्य आहे. याचसाठी आपण सदस्य नोंदणीद्वारे सामान्य माणसांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करतो.

**पक्षातील** संघटनेच्या जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांना संधी मिळावी, असा आपल्या नेतृत्वाचा हेतू असतो. आपल्या पक्षात कार्यकर्ता कोणत्या कुटुंबातील आहे, कोणत्या जाती-धर्मातील आहे याचा विचार न करता त्याने संघटनेसाठी दिलेल्या योगदानाचा विचार करून त्याच्यावर संघटनात्मक जबाबदारी सोपविली जाते. सामान्य माणसाला आपला पक्ष कोणत्या उद्दिष्टासाठी सत्ता मिळवू इच्छितो, तसेच सत्तेत असताना कोणती धोरणे राबवू इच्छितो, याची माहिती असणे आवश्यक असते. पक्षाचा कार्यकर्ता हा सामान्य माणूस आणि सरकार यांच्यातील दुवा असतो. याचसाठी जनसंघापासून आपण 'सदस्य नोंदणी अभियान' राबवित आहोत.

सदस्य नोंदणी कार्यक्रमाद्वारे पक्षाचा सहानुभूतीदार संघटनेशी जोडणे हा या अभियानाचा उद्देश आहे. आपल्या सर्वांचे नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पक्षाध्यक्ष असताना सदस्य नोंदणीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे ठरविले. त्यामुळे आपल्या पक्षाचे ११ कोटी सदस्य झाले आणि भारतीय जनता पार्टी हा जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष ठरला. यावेळच्या सदस्य नोंदणी अभियानात आपल्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी, लोकप्रतिनिधींनी उत्साहाने भाग घेतला. प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या सर्वांना दीड कोटी सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट दिले होते. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपल्या कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. निवडणुका संपल्या की, राजकीय पक्ष, नेतेमंडळी आपल्याला विसरतात अशी सामान्य माणसाची तक्रार असते. आपला पक्ष याला अपवाद आहे. संघटनेमार्फत वर्षभर आपले अनेक उपक्रम चालू असतात. या उपक्रमातून आपले लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि सामान्य कार्यकर्ते घरोघरी पोहोचतात. यावेळच्या सदस्य नोंदणी महाअभियानात सुमारे २०० कार्यकर्त्यांनी १ हजार सदस्य नोंदणी केली आहे. सार्वजनिक ठिकाणी फलक लावून भारतीय जनता पार्टीचे सदस्य बनण्यासाठी आवाहन केले गेले. प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुण्यात सदस्य नोंदणी अभियानात भाग घेताना व्यापारी, दुकानदारांशी थेट संपर्क साधला. भारतीय जनता पार्टीसारखा पक्षाचा प्रदेश अध्यक्ष व राज्याचा महसूल मंत्री अशा पद्धतीने पक्षाच्या सदस्य नोंदणीसाठी सामान्य जनतेत मिसळतो आहे, असा अनोखा अनुभव सामान्य माणसाने घेतला. केवळ निवडणुका जिंकणे हे संघटनेचे काम नाही तर पक्षाच्या विचारसरणीचा मतदारांना परिचय करून देणे, हे संघटनेचे मुख्य कर्तव्य आहे. देशातील अनेक राजकीय पक्ष हे एका कुटुंबापुरते मर्यादित बनले आहेत. एकाच कुटुंबातील अनेक व्यक्तींना सत्ता पदे, अधिकार पदे आणि पक्षातील जबाबदाऱ्या सोपविल्या जातात. या पक्षातील सामान्य कार्यकर्त्यांना कधीच संधी मिळत नाही. भारतीय जनता पार्टी हा विशिष्ट विचारधारेवर चालणारा पक्ष आहे. त्यामुळेच या विचारधारेसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पक्ष संघटनेतील जबाबदाऱ्या दिल्या जातात, लोकप्रतिनिधी बनण्याची संधी दिली जाते. कोणतीही राजकीय पार्श्वभूमीवर नसताना आपल्या पक्षाचे अनेक सामान्य कार्यकर्ते खासदार, आमदार, मंत्रीही झाले आहेत. सदस्य नोंदणी अभियान यशस्वी करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे मी अभिनंदन करतो. ■



नागपूर– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, आ. सुमित वानखेडे, आ. कृष्णा खोपडे, आ. विनोद अग्रवाल, आ. डॉ. संजय कुटे आदी.




अकोला– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, कामगार मंत्री आकाश फुंडकर, आ. संजय कुटे, आ. चैनसुख संचेती आदी.




सोलापूर– ज्येष्ठ नेते व आ. सुभाष देशमुख यांनी क्रीडांगणावर नागरिकांशी संपर्क साधत सदस्य अभियान राबवले.




नवी मुंबई– उपस्थिती– प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, माजी खासदार संजीव नाईक, सतीश निकम आदी.



संपूर्ण महाराष्ट्रात सोलापूर पूर्व जिल्ह्याने सदस्य नोंदणीमध्ये प्रथम क्रमांकाचे स्थान मिळविले. तसेच अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात विक्रमी ८४ हजार ७७९ एवढी सदस्य नोंदणी केल्याबद्दल जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार.

पुणे- सोलापूर मध्य आ.देवेंद्र कोठे यांचे अभिनंदन करताना प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण. उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सोलापूर शहराध्यक्ष नरेंद्र काळे आदी.



सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्याने सदस्य नोंदणीमध्ये तिसरा क्रमांक मिळवला. २ लाख ११ हजार ४७३ एवढी सदस्य नोंदणी केल्याबद्दल सोलापूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष चेतन केदार-सावंत यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार.





पुणे विभागात कोथरूड मतदार संघाने प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल कोथरूड दक्षिण अध्यक्ष डॉ. संदीप बुटाला व उत्तरचे अध्यक्ष सचिन पाषाणकर यांचा सत्कार प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, केंद्रीय नागरिक उड्डाण व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री व सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, शहराध्यक्ष धीरज घाटे आदी.

निलंगा ( जि. लातूर ) येथील नयन माने यांनी १ हजार पेक्षा अधिक सदस्य नोंदणी केल्याबद्दल आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या हस्ते सत्कार. उपस्थिती- जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, निलंगा तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रशांत पाटील आदी.



# काम करणाऱ्यांचा सत्कार



औसा विधानसभा मतदारसंघाने प्रति बूथ सर्वाधिक सदस्य नोंदणी करून राज्यात अव्वल क्रमांक प्राप्त केला आहे. याबद्दल आ. अभिमन्यू पवार यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार.



एक हजार सदस्य नोंदणी केल्याबद्दल लातूर जिल्ह्यातील अमोल नागनाथ निडवदे यांचा इतर मागास कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते सत्कार. उपस्थिती– जिल्हाध्यक्ष दिलीप देशमुख, भारत चामे, युवराज पाटील, नितीन रेड्डी आदी.




१ हजार सदस्य नोंदणी– पुसद येथील डॉ. आरती फुपाटे यांचा सत्कार. उपस्थिती– कामगार मंत्री आकाश फुंडकर, माजी आमदार नामदेव ससाणे, नितीन भुतडा, महादेव सुपारे, विनोद जिल्हेवार आदी.



कोंड (जि. धाराशिव) येथील ग्राम पंचायत सदस्य राहुल अशोक जाधव यांनी १ हजार सदस्य नोंदणी पूर्ण केल्याबद्दल आ. राणा जगजीत सिंह पाटील यांच्या हस्ते सत्कार. उपस्थिती– उद्धवबाबा पाटील, दत्ता देवळकर, बाळासाहेब खांडेकर, संगमेश्वर स्वामी, गोविंद पाटील, निशिकांत पाटील, पांडुरंग पाटील आदी.

# नमो किसान सन्मान निधी ३ हजार रु. नी वाढविणार



> केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या विकासासाठी समर्पित असून या दिशेने जोरकस प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा फायदा होत आहे. राज्य शासनही केंद्राप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांना 'नमो किसान सन्मान निधी योजनेंतर्गत' ६ हजार रुपये देत असून लवकरच हे अर्थसहाय ३ हजार रुपयांनी वाढविण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बिहारमधील भागलपूर येथे 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याचे वितरण' झाले. या वितरणाचा राज्यस्तरीय कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला यावेळी ते बोलत होते. पीएम किसान सन्मान निधी योजनेद्वारे देशातील शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात आर्थिक मदत मिळत आहे. या योजनेंतर्गत केंद्र शासन वर्षाला शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट ६ हजार रुपये वितरीत करते. तर राज्य शासनाच्या वतीने 'नमो किसान सन्मान निधी योजनेद्वारे' शेतकऱ्यांना वर्षाकाठी ६ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात येते. आता राज्य शासन या निधीत ३ हजार रुपयांनी वाढ करणार असून राज्याद्वारे ९ हजार आणि केंद्रशासनाचे ६ हजार असे शेतकऱ्यांना आता वर्षाला १५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार आहे.

### सर्व शेतकऱ्यांना सर्व योजनांचा लाभ

राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी 'जलयुक्त शिवार योजना' आणली, त्यातून मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे झाली. केंद्र शासनाकडून 'बळीराजा



जलसंजीवनी योजना' मंजूर करून घेतली. या योजनेतून विदर्भातील ८९ सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यात आले. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या पहिल्या टप्प्याची अंमलबजावणी करण्यात आली असून दुसऱ्या टप्प्यात मराठवाडा व विदर्भातील उर्वरित भागात या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत कृषी औजार, शेततळी आदी अनुदान पद्धतीने लक्षांक न ठेवता गावातील सर्व शेतकऱ्यांना सर्व योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. ६ हजार कोटींच्या खर्चातून या योजनेंतर्गत आतापर्यंत कामे झाली असून येत्या काळात ही योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकरी उत्पादक गटांना रोजगारक्षम कृषी प्रक्रिया उद्योग, ग्रेडींग व्यवस्था आदी समग्र सुविधा पुरवणारी 'स्मार्ट योजना' आणली असून त्याचा बहुतांश शेतकरी लाभ घेवून विकास साधत आहेत. ग्रीस्टॅक ही महत्वाची योजना हाती घेण्यात आली आहे. याद्वारे संपूर्ण शेतीचे डिजीटायजेशन करून प्रत्येक शेतकऱ्याला आवश्यक लाभ देण्यात येणार आहे. मध्यस्थाशिवाय शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्याला लाभ मिळणार आहे. राज्यात आतापर्यंत ग्रीस्टॅक अंतर्गत ५४ टक्के शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली असून लवकरच १०० टक्के उद्दीष्ट गाठण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

येत्या ५ वर्षात शेतकऱ्यांकडून वीज बिल न घेण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मागेल त्याला सौरपंप योजना सुरू असून मागील १ वर्षात १ लाख शेतकऱ्यांना याअंतर्गत सौरपंप देण्यात आले आहेत. सौरपंप घेणाऱ्या शेतकऱ्यांना पुढील २५ वर्षात वीज बिलाची चिंता नसणार असे ही त्यांनी सांगितले. गेल्या अडीच वर्षात १५० पेक्षा जास्त सिंचन योजनांना फेर प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## विदर्भातील शेतीचे चित्र बदलणारा वैनगंगा–नळगंगा नदी जोड प्रकल्प

विदर्भातील शेतीचे चित्र बदलणारा वैनगंगा–नळगंगा नदी जोड प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या माध्यमातून गोसेखुर्द धरणातील वाया जाणाऱ्या पाण्याचा उपयोग करून वैनगंगा नदीद्वारे ५५० कि.मी. पर्यंत पाणी वाहून नेत बुलडाणा जिल्ह्यातील नळगंगा नदीपर्यंत घेवून जाण्यात येणार आहे. याद्वारे नागपूर, अमरावती, वर्धा, अकोला, बुलडाणा अशा एकूण ७ जिल्ह्यांमध्ये दुष्काळी भागाला याचा फायदा होणार आहे. या प्रकल्पाद्वारे १० लाख हेक्टर जमीन ओलीताखाली येणार असून याद्वारे मोठे परिवर्तन घडेल, असेही त्यांनी सांगितले. ड्रोन दीदी योजनेद्वारे महिलांना प्रशिक्षण देवून ड्रोनद्वारे शेतीत फवारणी करण्याचा अभिनव प्रकल्पही हाती घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## शेतीच्या विकासासाठी कृत्रीम बुध्दीमत्तेचा वापर

कृषीराज्य मंत्री आशिष जयस्वाल म्हणाले, शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राज्य शासन प्रयत्नरत आहे. 'पीएम किसान सन्मान निधी' व 'नमो किसान सन्मान निधी'च्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून उत्पादन वाढीसाठी व शेतीच्या विकासासाठी कृत्रीम बुध्दीमत्तेचा वापर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याचे २२ हजार कोटी रूपये देशातील शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यात आले. राज्यातील ९२.८९ लाख शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यात १ हजार ९६७ कोटी रूपये थेट वितरीत झाले आहेत. मागील सहा वर्षात 'पीएम किसान सन्मान निधी' योजनेंतर्गत देशातील ३.७ लाख कोटी शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यात वितरीत करण्यात आले. तर राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना या योजनेंतर्गत आतापर्यंत एकूण १८ हप्त्यांमध्ये ३३ हजार ५६५ कोटींचा लाभ जमा झाला आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते वनामती परिसरातील कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. त्यांनी प्रदर्शनाला भेट देऊन विविध स्टॉलची पाहणी केली. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रगतीशील शेतकऱ्यांना गौरविण्यात आले. ■


# यूएस-एड (USAID)- जगातील सामाजिकतेला मदत की अमेरिकेच्या पोलिसगिरीला?

● अमिता आपटे

अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून शपथ घेतल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी येत्या काळात विविध देशांना दिली जाणारी यूएसएड US-AID अर्थात 'एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट' बंद करून टाकण्याच्या घोषणेमुळे जगभरातील डाव्या संघटनांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. डावे विचारवंत मोदी सरकारच्या कारकिर्दीत भारतातील सामाजिक संस्थांना पाठवत असलेली मदत अमेरिका आता थांबवणार आणि हा मोदींचा पराभव आहे, अशी हास्यास्पद मांडणी करायचा प्रयत्न ही डावी मंडळी करत आहेत.



**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेमार्फत विविध देशांना अर्थसहाय्य करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली यूएसएड (USAID) ही संस्था बंद करण्याचे जाहीर केले आहे. यूएसएडमार्फत भारतात मागील वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी बायडेन प्रशासनाकडून अर्थसहाय्य केले होते, असे ट्रम्प यांनी सांगितले.**



**ट्रम्प** यांनी सार्वजनिक मंचावरून यूएसएड ही संस्था कट्टरपंथियांकडून द्वारे चालवली जात असल्याचे म्हटले आहे, तर डिपार्टमेंट ऑफ गव्हर्नमेंट इफिशियन्सी (DOGE) चे संचालक एलॉन मस्क यांनी त्याला गुन्हेगारी संस्था म्हटले आहे. ही एजन्सी पूर्णपणे बंद करून टाकावी किंवा ती स्टेट डिपार्टमेंटला जोडून घ्यावी, अशी सूचना त्यांनी केली आहे. ट्रम्प प्रशासनाला डाव्यांनी कितीही दूषणे दिली, तरीसुद्धा ही निरीक्षणे किती महत्वाची आणि योग्य आहेत ते समजावून घेऊ. गेली १०० वर्षे जगातील सर्वात श्रीमंत देश म्हणवला जाणारा, आजच्या घडीलाही सर्वाधिक शक्तिमान असणाऱ्या, देशातील नागरिकांच्या कराचा पैसा चोरून अमेरिकेने पृथ्वीवरील बहुतांश अन्य देशात अराजकता माजवण्यासाठी हा पैसा वापरला. अमेरिकन taxpayer चा पैसा USAID तर्फे जॉर्ज सोरोस, फोर्ड फाउंडेशन, बिल गेट्स फाऊंडेशन इत्यादी डीप स्टेट्स चालवणाऱ्या entities च्या सूचनांनुसार जगभरात वितरित होत होता. त्यांच्या सोयीची सरकारे






**यूएसएड ही संस्था गुन्हेगारी स्वरूपाची आहे, अशी टीका एलन मस्क यांनी जाहीरपणे केली आहे.**

आणणे, प्रतिकूल सरकारे पाडणे, जगभरातील समाजांची सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक धारणा नष्ट करणे, वेगवेगळे समाज विविध कारणांनी एकमेकांविरुद्ध उभे करून गृहयुद्ध घडवणे, Woke संस्कृतीचा पुरस्कार करून देश, समाज इत्यादी व्यवस्था कोलमडून टाकणे, अशा सर्व विनाशी गोष्टींसाठी वापरला जात होता, हे आता सिद्ध झाले आहे.

परकीय निधी नियंत्रण कायदा (२०१०) (FCRA) या अंतर्गत अनेक अनैतिक आणि भारतविरोधी कारवाया करणाऱ्या विविध संघटनांना चाप बसवण्याचा प्रयत्न भारत सरकार गेली काही वर्षे करत आहे. परंतु जिथून या कारवायांना निधी प्राप्त होतो, त्या मूळ टँकलाच बूच बसवायची अफलातून क्लृप्ती आणि प्रभाव शक्ती आज भारतीय सत्ताधिकाऱ्यांकडे आहे,ही समाधानाची बाब आहे. २००८ चा मुंबईत झालेला २६-११ चा हल्ला आठवतोय? तो हल्ला ज्या हाफिज सईदने घडवून आणला त्याच्या LeT अर्थात लष्कर-ए-तैयबाची एक सामाजिक कामाचा आव आणणारी संस्था आहे; जिचे नाव फलाह ए इन्सानियत फाऊंडेशन. ही संस्था अमेरिकेच्या मिशिगनमधील Helping Hand for Relief and Development (HHRD) या संस्थेच्या आर्थिक सहाय्यावर चालते. पाकिस्तानमधील या संस्थेच्या बहुतांश कामांत The Falah E Insaniyat Foundation (फलाह ए इन्सानियत फाऊंडेशन)चे लोक पाहायला मिळतात. गंभीर बाब अशी की, २००८ च्या हल्ल्याआधीच या HHRD या संस्थेला USAID कडून १ लाख १० हजार डॉलर्स निधी पाठवला गेला होता. ही बाब तत्कालीन अमेरिकन सरकार आणि आतंकवादी गटांचे आर्थिक संबंध आणि अमेरिकी सरकाराच्या नीतिमत्तेबद्दल स्वाभाविक प्रश्न उपस्थित करते. इतकी वर्षे हा सगळा मामला 'तेरी भी चूप मेरी भी चूप' असा होता. परंतु, आता बरेच लोक यावर स्पष्ट भूमिका मांडू लागले आहेत.

बांगलादेशमध्ये जो उठाव होऊन हसीना सरकार कोसळले, त्यामागेही जो बायडेनने धाडलेले US-AID होते, नेपाळची सामाजिक घडी बदलायचे पद्धतशीर प्रयत्न US-AID तर्फे होत असल्याचे उघड झाले आहे. या गोष्टी तसेच २६-११ चे प्रकरण जागतिक स्तरावरील US-AID भूमिकेचे आणि त्यांच्या कारनाम्यांच्या व्यापक परिणामांचा अंदाज येण्यासाठी पुरेसे आहे. भारतातील मणिपूर अराजक, नागरिकत्व सुधारणा कायदा (CAA) विरोधी झालेले आंदोलन, शेतकरी आंदोलन, शाहिनबाग आंदोलन, विविध निवडणुका या विविध अराजकतवादी प्रकारांमध्ये US-AID चा हात असल्याचे बोलले जात आहे. यू.एस. एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट (यूएस-एआयडी) ही काँग्रेसद्वारे १९६१ मध्ये ४२.८ अब्ज डॉलर्सच्या वार्षिक बजेटसह, स्थापन केली गेलेली स्वतंत्र संस्था जगातील विविध देशांच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी, शिक्षण, आरोग्य आणि जगभरातील आपत्ती निवारणात मदत करण्यासाठी म्हणून स्थापन झाली. आफ्रिकेत आरोग्यसेवा पुरविण्यापासून ते पूर्व युरोपमधील लोकशाही संस्था मजबूत करण्यापर्यंत US-AID नेहमी अमेरिकन सॉफ्ट पॉवर म्हणून काम करत आले आहे. ही एजन्सी अमेरिकन गुप्तचर यंत्रणा CIAचे एक प्रमुख साधन असल्याचा तिखट आणि सुस्पष्ट आरोप आता सत्य सिद्ध होताना दिसू लागला आहे. **(पूर्वार्ध)**

# आंतरराष्ट्रीय परीप्रेक्ष्यात नरेंद्र मोदी




● शिवप्रकाश
राष्ट्रीय सहसंघटन मंत्री



> २०१४ मध्ये नरेंद्र मोदी भारताचे पंतप्रधान झाले. गेल्या ११ वर्षात श्री. मोदी यांना जगातील २० देशांनी आपल्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविले आहे. प्रत्येक भारतीय नागरिकाच्या दृष्टीने ही अत्यंत अभियानाची गोष्ट आहे. आपल्या पंतप्रधानाचा आंतरराष्ट्रीय पातळीवर एवढा सन्मान होतो आहे, याचा भारतीय म्हणून आपल्याला अभियान वाटायला हवा.

**अमेरिका,** रशिया याचबरोबर सौदी अरेबिया, कुवेत, अफगाणिस्तान या मुस्लिम देशांनीही श्री. मोदी यांना आपला सर्वोच्च नागरी पुरस्कार दिला आहे. आपल्या देशाचा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर प्रभाव वाढतो आहे, हेच यातून सिद्ध झाले. हे एकाएकी घडलेले नाही. गेल्या १० वर्षात अनेक घटनांमध्ये नरेंद्र मोदी यांनी आपल्या नेतृत्व गुणांचा परिचय देत जगात आपली नवी ओळख निर्माण केली. ५ वर्षापूर्वी संपूर्ण जग कोरोना नामक संकटात सापडले. त्यावेळी प्रत्येक देशाचे नेतृत्व आपल्या नागरिकांचे या संकटापासून संरक्षण करण्यासाठी झगडत होते. या संकटात श्री. मोदी यांनी 'जान भी, जहान भी' असे जाहीर करत देशव्यापी टाळेबंदी घोषित केली. या आजाराचा मुकाबला जागरूक राहून धैर्याने केला पाहिजे, हे श्री. मोदी यांनी सामान्य माणसाला समजावून सांगितले. कोरोना प्रतिबंधक लस देशातच बनली पाहिजे, यासाठी श्री. मोदी यांनी आग्रही भूमिका घेतली. अनेक प्रगत देशांनाही आपल्या प्रमाणे स्वदेशी लसीची निर्मिती करता आली नाही. आपल्या देशातील नागरिकांना लस देताना जगातील सुमारे ९८ देशांना भारताने त्याकाळात लस पुरविली. बांग्लादेश, म्यानमार, भूतान, नेपाळ, श्रीलंका, मालदीव, ओमान, बहारीन, मॉरिशस यासारख्या देशांना भारताने मोफत लस पुरविली आणि या देशांच्या नागरिकांचे प्राण वाचवण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली. आपल्या भारतीय संस्कृतीत 'सर्वे भवन्तु सुखिन:' ही संकल्पना आहे. या संकल्पनेला जागूनच श्री. मोदी यांनी कोरोना काळात अनेक देशांना कोरोना प्रतिबंधक लसीचा पुरवठा केला.







यासारख्या अनेक घटनांमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताबद्दलचा आदर वाढू लागला आहे. समृद्धी, सुरक्षा, संवाद, सभ्यता आणि संस्कृती या पाच तत्वांच्या आधारे पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या नव्या परराष्ट्र धोरणाची ओळख जगाला करून दिली. आंतरराष्ट्रीय संबंध ठेवताना भारत नेहमी आपले हित पाहिल, हे श्री. मोदी यांनी ठामपणे अनेक प्रसंगात दाखवून दिले. देशहिताशी कोणत्याही प्रकारे तडजोड केली जाणार नाही, हे दाखवित असताना श्री. मोदी यांनी वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेक देशांना स्वत:हून मोठे सहकार्य केले. जगभरातील अनेक देशांमध्ये भारतीय नागरिक आहेत. या भारतीय नागरीकांनी आपल्या मायभूमीच्या विकासात विविध प्रकारे योगदान द्यावे, यासाठीही श्री. मोदी यांनी प्रयत्न केले. गेल्या ११ वर्षात श्री. मोदी ज्या-ज्या देशांमध्ये गेले त्या-त्या देशांमधील भारतीय नागरीकांशी त्यांनी संपर्क साधला. नैसर्गिक वा अन्य संकटांमुळे बाहेरच्या देशांमध्ये अडकून पडलेल्या भारतीय नागरीकांना सुखरूप मायदेशी आणण्यासाठी श्री. मोदी यांनी यशस्वी प्रयत्न केले. जी-२० समुदायाचे अध्यक्षपद मिळाल्यानंतर भारतात जी-२० परिषदेच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करून या देशांच्या प्रमुखांना भारतीय संस्कृतीचा परिचय करून दिला. आफ्रिका महासंघातील देशांना जी-२० गटाचे स्थायी सदस्यत्व देण्यासाठी श्री. मोदी यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. पाकिस्तानकडून झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर या देशावर सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईक करत श्री. मोदी यांनी भारत आपल्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड करणार नाही, हे जगाला दाखवून दिले. त्यामुळे जगात भारताची प्रतिमा एक सामर्थ्यशाली देश अशी तयार झाली. दहशतवाद हा दहशतवादच असतो, दहशतवादामुळे संपूर्ण जगाला धोका आहे, हे श्री. मोदी यांनी जगाला पटवून दिले. जलवायू प्रवर्तनासारख्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर श्री. मोदी यांनी विविध व्यासपीठावर ठाम भूमिका मांडली. जगातील कोणतीही समस्या असो, त्यात श्री. मोदी हे सर्वांशी समन्वय साधत मार्ग काढू शकतात, असा विश्वास जगभरात निर्माण झाला. भारताने जगाला नेहमीच शांततेचा संदेश दिला आहे. 'युद्ध नको, बुद्ध हवा', असे भारताचे जगाला सांगणे आहे. बुद्धाच्या शांततेच्या संकल्पनेनुसारच श्री. मोदी हे वाटचाल करत आहेत. त्यामुळेच जगातील प्रमुख नेत्यांच्या यादीमध्ये श्री. मोदी यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. ■

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबतची कार्यपद्धती

**मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमार्फत गरजू रुग्णांना अर्थसहाय्य केले जाते. वैद्यकीय उपचारासाठीचे शुल्क ज्यांना आर्थिक स्थितीअभावी भरणे कठीण असते अशांसाठी ही योजना उपयुक्त आहे. या योजनेतून मदत कशी मिळवावी, याबाबतची माहिती तसेच या योजनेतून कोणाला मदत मिळत नाही, याची माहिती देत आहोत.**

**१)** रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्यानंतर त्या प्रकरणांची शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे अशा रुग्णांना अर्थसहाय्य मिळत नाही.

**२)** महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना (मोफत उपचार):– या योजनेच्या आपल्या जिल्ह्याच्या समन्वयकास फोन करुन पेशंटला नामतालिकेवरील (Empaneled) दवाखान्यात ॲडमिट करावे.

**३)** चॅरिटी हॉस्पीटल (मोफत / सवलतीच्या दरात):– जिल्ह्यातील चॅरिटी हॉस्पीटलमधील उपलब्ध बेडबाबत माहिती चॅरिटी इन्स्पेक्टरच्या कार्यालयातून घेवून रुग्णास चॅरिटी बेड उपलब्ध असलेल्या दवाखान्यात ॲडमिट करावे. (www.charity.maharashtra.gov.in)

**४)** राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (RBSK) (मोफत उपचार)– ०–१८ वर्षे वयापर्यंतच्या पेशंटसाठी या योजनेअंतर्गत मोफत उपचार केले जातात. आपल्या जिल्ह्याच्या समन्वयकास फोन करुन योजनेतील दवाखान्यात ॲडमिट करावे. (www.rbsk.gov.in)

**५)** मुख्यमंत्री सहाय्यता निधी– १. कॉकलियर इम्प्लांट (वय वर्षे २ ते ६), २. हृदय प्रत्यारोपण, ३. यकृत प्रत्यारोपण, ४. किडणी प्रत्यारोपण, ५. फुफ्फुस प्रत्यारोपण, ६. बोन मॅरो प्रत्यारोपण, ७. हाताचे प्रत्यारोपण, ८. हिप रिप्लेसमेंट ९. कर्करोग शस्त्रक्रिया, १०. अपघात शस्त्रक्रिया, ११. लहान बालकांचे शस्त्रक्रिया, १२. मेंदूचे आजार, १३. हृदयरोग, १४. डायलिसिस,, १५. कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), १६. अपघात, १७. नवजात शिशुंचे आजार, १८. गुडघ्याचे प्रत्यारोपण, १९. बर्न रुग्ण, २०. विद्युत अपघात रुग्ण, या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी उपरोक्त तीनही योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या आणि राज्यातील या योजनेत नोंदणीकृत रुग्णालयात उपचार घेणाऱ्या पात्र रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून वैद्यकीय समितीमार्फत तपासून अर्थसहाय्य दिले जाते. **संपर्क क्र. ०२२–२२०२६९४८** मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष अंगीकृत असलेल्या रुग्णालयांची सविस्तर माहिती व रुग्णालयांची यादी वेबसाईटवर आहे. **(cmrf.maharashtra.gov.in)**

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, धर्मादाय रुग्णालये यामध्ये लाभार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा व मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये या प्रयोजनार्थ उपलब्ध सिमित निधीचा यथोचित वापर व्हावा म्हणून उपरोक्त योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीमधून लाभ देण्यात येतो.

राज्याबाहेरील रुग्णालयांवर महाराष्ट्र शासनाच्या यंत्रणांचे नियंत्रण नसते. तसेच त्यांचेकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेणे शक्य होत नसल्यामुळे राज्याबाहेरील रुग्णालयांना अर्थसहाय्य प्रदान करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय समितीच्या शिफारशीनुसार रु. २५ हजार, ५० हजार, १ लक्ष आणि महत्तम २ लक्ष आजारांनिहाय मर्यादित रक्कम प्रदान करण्यात येत आहे.

अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी.

Email id - aao.cmrf-mhgov.in

**१.** अर्ज (विहीत नमुन्यात)

**२.** निदान व उपचारासाठी लागणाऱ्या वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. (खाजगी रुग्णालय असल्यास सिव्हील सर्जन यांचेकडून प्रमाणित करणे आवश्यक आहे.)

**३.** तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला (रु. १.६० लाख पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.)

**४.** रुग्णाचे आधारकार्ड (महाराष्ट्र राज्याचे) लहान बाळासाठी आईचे आधारकार्ड आवश्यक.

५. रुग्णाचे रेशनकार्ड (महाराष्ट्र राज्याचे)

६. संबंधीत आजाराचे रिपोर्ट असणे आवश्यक आहे.

७. अपघातग्रस्त रुग्णांसाठी MLC रिपोर्ट आवश्यक आहे.

८. प्रत्यारोपण रुग्णांसाठी ZTCC / शासकीय समितीची मान्यता आवश्यक आहे.

९. रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असल्याची खात्री करावी.

✻ अर्थसहाय्याची मागणी ई-मेल द्वारे केल्यास अर्जासह सर्व कागदपत्रे PDF स्वरुपात (वाचनीय) पाठवून त्याच्या मुळ प्रती मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे टपालाद्वारे तात्काळ पाठविण्यात यावेत.

**रुग्णांसाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीचा तपशील**

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव व आधारकार्ड क्रमांकः ..

२. अर्जदाराचा कायमचा पत्ता : .

तालुका : .......... जिल्हा :.............................. पिनः ....................

३. अर्जदाराचा मोबाईल क्रमांक व रुग्णाशी असलेल नाते :

**महाराष्ट्र शासन**

**मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठीचा अर्ज**

**रुग्णाचा तपशील**

१. रुग्णाचे संपूर्ण नाव (मराठीत): ..........................................................................

(In Capital Letters) इंग्रजीतः ..........................................................................

२. रुग्णाचा आधार कार्ड क्रमांक : ..........................................................................

३. रुग्णाचा कायमचा पत्ता : ..........................................................................

४. रुग्णाच्या जवळच्या नातेवाईकांचा चालू मोबाईल नं. :..........................................................

५. रुग्णाचा ई मेल : ..........................................................................

**आजाराबाबत तपशील**

१. रुग्णाला झालेल्या आजाराचे नाव : ..........................................................................

२. उपचार चालू असलेल्या रुग्णालयाचे नाव व पत्ता : ..........................................................

तालुका : ..................... जिल्हा : ........................ पिन : ..................................................

३. उपचारासाठी रुग्णालयाच्या खर्चाचे अंदाजपत्रक रु.  / दिनांक...............(सोबत जोडणे)

४. संपूर्ण उपचारासाठी लागणारा अंदाजे कालावधी : ..........................................................

५. उपचार चालू असलेल्या रुग्णालयाचा संपर्क क्रमांक : ..........................................................

६. उपचार करत असलेल्या डॉक्टरांचे नाव : ..........................................................................

७. रुग्ण रुग्णालयात दाखल असल्यास बेड व वार्ड क्रमांक आणि दाखल झाल्याची तारीख : ...................

८. रुग्णालयाचा ई-मेल आयडी : ..........................................................................

<u>**आवश्यक कागदपत्रांचा तपशील**</u>

१. कुटुंबाचे एकत्रित उत्पन्न रुपये उत्पन्नाचे प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक .........................................
(पतीचे/पत्नीचे उत्पन्न प्रमाणपत्र जोडावे) (रुग्ण अल्पवयीन असल्यास वडीलांचे / आईचे)

२. शिधापत्रिका क्रमांक : ............................................... दिनांक : ................................
(रुग्णाचे शिधापत्रिकेत नाव असणे आवश्यक)

आर्थिक मदतीसाठी शिफारस करणाऱ्या लोकप्रतिनिधी (मा. मंत्री / मा. आमदार / मा. खासदार) यांचा तपशिल (असल्यास)

संपूर्ण नाव व पदनाम : ...........................................................................................

मी प्रमाणित करतो/करते की वरील प्रमाणे दर्शविलेली सर्व माहिती खरी व सत्य आहे. त्यात काही खोटी माहिती आढळल्यास शासनाच्या नियमाप्रमाणे होणाऱ्या कायदेशीर कारवाईस मी सही करणारा जबाबदार राहील याची मला जाणीव आहे.

रुग्णाचा फोटो                    अर्जदाराचा फोटो                    अर्जदाराची सही / अंगठा :-

---

अर्ज क्र:                                                                                    दिनांक :

महाराष्ट्र शासन
मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठीचा अर्ज

**महत्वपूर्ण सूचना**

**१.** डिस्चार्ज झालेल्या/उपचार पूर्ण झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती म्हणून अर्थसहाय्य दिले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच अर्ज करण्यापूर्वी खालील शासकीय योजनांसाठी पात्र असल्यास लाभ घ्यावा.

**२.** रुग्ण महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना/आयुष्मान भारत/राष्ट्रीय बालक स्वास्थ कार्यक्रम/धर्मदाय रुग्णालय इत्यादी कोणत्याही एका योजनेत लाभार्थी असल्यास अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

**३.** अर्जात दर्शविलेल्या माहितीशी संबंधीत कागदपत्रे / प्रमाणपत्रे अर्जदाराने स्व साक्षांकित (Self-attested) करुन सोबत जोडणे अनिवार्य आहे.

**४.** संशयास्पद अथवा खोटी/बनावट माहिती दिलेली आढळल्यास तो अर्ज रद्द करण्यात येईल तसेच कायदेशीर पोलीस कारवाईला पात्र ठरेल.

# 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियानाने दशकभरात घेतली उंच भरारी




**मुलगी** ही ईश्वराची अनमोल देणगी असते. मात्र आधी देशात त्यांना कमी लेखले जात असे. १९६१ ते २०११ पर्यंत झालेल्या प्रत्येक जनगणनेमध्ये मुलींची संख्या मुलांच्या तुलनेत कमी असायची. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक याचक म्हणून मुलींच्या जीवनाची याचना करुन ज्या बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानाची सुरुवात केली होती त्या मोहिमेला २२ जानेवारी २०२५ रोजी एक दशक पूर्ण झाले आहे. २४ जानेवारी या राष्ट्रीय कन्या दिवसाचे औचित्य साधून कशाप्रकारे या अभियानाने लोकांची मानसिकता आणि व्यवस्थेत बदल केला ते जाणून घेऊया.

हरयाणामधील पानीपत येथून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २२ जानेवारी २०१५ रोजी हे आवाहन करुन 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजनेचा आरंभ केला होता. त्यानंतर अनेक वेगवेगळ्या प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले, 'मुलगा आणि मुलगी समान आहेत' हा आपला मंत्र असायला हवा; त्याचवेळी पंतप्रधानांनी त्यांनी दत्तक घेतलेल्या वाराणसीतील जयपूर या गावातील नागरिकांना सांगितले होते, की 'चला कन्या जन्माचा उत्सव साजरा करूया. मुलीच्या जन्माचा उत्सव साजरा करण्यासाठी पाच पाच रोपे लावा. याच प्रकारे हरयाणामधील बीबीपूरच्या सरपंचांच्या'सेल्फी विथ डॉटर' या उपक्रमाचे पंतप्रधानांनी केवळ कौतुकच केले नाही तर 'मन की बात' कार्यक्रमात मुलींसोबतचे सेल्फी पाठवण्याची नागरिकांना विनंती केली, ज्याचे जागतिक स्तरावर कौतुक झाले. अशी आवाहने, साद आणि सरकारी यंत्रणेत मुलींसाठी खुली झालेली संधीची कवाडे यामुळे समाजातील मुलींबाबतची मानसिकता बदलली आहे. आकडेवारी दर्शविते की त्या अभ्यास करत आहेत आणि पुढे जात आहेत.

**देशाचे पंतप्रधान एक याचक होऊन आपल्याकडे मुलींच्या जीवनाची याचना करत आहे. आपल्या मुली आपल्या कुटुंबाचा अभिमान आहेत, राष्ट्राचा सन्मान आहेत, अशी भावना ठेवा. मग या असंतुलनातून आपण लवकरच बाहेर पडू, हे तुम्हाला दिसेलच. मुलगा आणि मुलगी हे दोघेही असे दोन पंख आहेत, ज्यांच्याशिवाय जीवनाची उंची गाठता येणे शक्य नाही. तुम्हाला उंच उडायचे असेल तर तुमच्या स्वप्नांना मुलगा आणि मुलगी दोघांचे पंख हवेत, तरच तुमची स्वप्ने पूर्ण होतील.**

**(शेष पान २१ वर)**

# राष्ट्र उभारणीच्या 'अटल' आदर्शाची शताब्दी



● नरेंद्र मोदी पंतप्रधान

अटलबिहारी वाजपेयी असते तर ते यावर्षी १०० वर्षांचे झाले असते. भारतीय राजकारणात आदर्श आणि प्रशासनात सुशासनाची स्थिर तत्त्वे प्रस्थापित करण्याचे श्रेय त्यांनाच जाते. भारताचे राष्ट्रीय नेते म्हणून अटलजींच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या लेखणीतून त्यांचे स्मरण केले...

**मैं जी भर जिया, मैं मन से मरु...**
**लौटकर आऊंगा, कूच से क्यों डरुं...**

अटलजींचे हे शब्द किती धाडसी आहेत... किती गूढ आहेत! अटलजींना कशाचीच भीती नव्हती... त्यांच्यासारखे व्यक्तिमत्त्व कोणाला घाबरत नव्हते. ते असेही म्हणायचे... आयुष्य म्हणजे भटक्यांचा प्रवास आहे. आज इथे आहे, उद्याचा प्रवास कुठे आहे... सकाळ कुठे असेल, कुणास ठाऊक... आज ते आपल्यात असते तर स्वतःच्या वाढदिवसाची नवी पहाट पाहत असते. तो दिवस मी विसरू शकत नाही जेव्हा त्यांनी मला जवळ बोलावून मिठी मारली... आणि पाठीवर जोरात थोपटले. तो स्नेह... ती आपुलकी... ते प्रेम... माझ्या आयुष्यातला खूप मोठा ठेवा आहे.

२५ डिसेंबरचा हा दिवस भारतीय राजकारण आणि भारतीय जनतेसाठी एक प्रकारे सुशासनाचा अटल दिवस असतो. आज संपूर्ण देश आपल्या भारतरत्न अटलजींचे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून स्मरण करत आहे, ज्यांनी आपल्या सोजन्याने, साधेपणाने आणि दयाळूपणाने कोट्यवधी भारतीयांच्या मनात स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या योगदानाबद्दल संपूर्ण देश कृतज्ञ आहे. त्यांच्या राजकारणाबद्दल कृतार्थ आहे.

२१ व्या शतकाला भारताचे शतक बनवण्यासाठी त्यांच्या रालोआ सरकारने उचललेल्या पावलांमुळे देशाला नवी दिशा आणि नवी गती मिळाली. १९९८ मध्ये त्यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली तेव्हा संपूर्ण देश राजकीय अस्थिरतेने घेरला होता. ९ वर्षात देशाने चार वेळा

लोकसभेच्या निवडणुका बघितल्या होत्या. हे सरकारही त्यांच्या अपेक्षा पूर्ण करू शकणार नाही, अशी लोकांना शंका होती. अशा वेळी एका सामान्य कुटुंबातून आलेल्या अटलजींनी देशाला स्थिरता आणि सुशासनाचे प्रारूप दिले. भारताच्या नवविकासाची हमी दिली.

ते असे नेते होते की ज्यांचा प्रभाव आजही 'अटल' आहे. ते भावी भारताच्या संकल्पनेचे द्रष्टे होते. त्यांच्या सरकारने देशाला माहिती-तंत्रज्ञान, दूरसंपर्क आणि दूरसंचार क्षेत्रांमध्ये वेगाने पुढे नेले. त्यांच्या राजवटीतच तंत्रज्ञानाला सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्याचे काम रालोआने सुरू केले. भारतातील दुर्गम भाग मोठ्या शहरांशी जोडण्याचे यशस्वी प्रयत्न झाले. भारतातील महानगरे एकत्र आणणारी वाजपेयी सरकारच्या काळात सुरू झालेली सुवर्ण चतुर्भुज योजना आजही लोकांच्या आठवणीत अमिट आहे. स्थानिक संपर्क वाढवण्यासाठी रालोआ सरकारने प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेसारखे कार्यक्रमही सुरू केले. त्यांच्या राजवटीत दिल्ली मेट्रो सुरू झाली, ज्याचा आज आमचे सरकार जागतिक दर्जाचा पायाभूत सुविधा प्रकल्प म्हणून विस्तार करत आहे. अशा प्रयत्नांतून त्यांनी आर्थिक प्रगतीला नवे बळ तर दिलेच, शिवाय दूरवरच्या भागांना एकमेकांशी जोडून भारताची एकात्मताही मजबूत केली.

जेव्हा जेव्हा सर्व शिक्षा अभियानाची चर्चा होते तेव्हा अटलजींच्या सरकारचा उल्लेख नक्कीच होतो. शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य मानणाऱ्या वाजपेयीजींनी अशा भारताचे स्वप्न पाहिले होते जिथे प्रत्येक व्यक्तीला आधुनिक आणि दर्जेदार शिक्षण मिळेल. सर्व ओबीसी, एससी, एसटी, आदिवासी आणि महिलांसाठी शिक्षण सहज आणि सुलभ असावे अशी त्यांची आकांक्षा होती.

त्यांच्या सरकारने देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी अनेक मोठ्या आर्थिक सुधारणा केल्या. या सुधारणांमुळे घराणेशाहीत अडकलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळाली. त्या सरकारच्या काळात बनवलेल्या धोरणांचा मूळ उद्देश सर्वसामान्यांच्या जीवनात बदल घडवून आणणे हा होता. त्यांनी संपूर्ण जगाला हा संदेश दिला की हा जुना भारत नाही. भारत आता दडपणाखाली असणारा देश नाही, हे साऱ्या जगाला कळून चुकले होते. या अणुचाचणीमुळे देशावर निर्बंध लादले गेले, पण देशाने सगळ्याचा सामना केला.

त्यांच्या सरकारची अशी अनेक अद्भूत आणि धाडसी उदाहरणे आहेत, ज्यांचे आजही आपण देशवासीय अभिमानाने स्मरण करतो. ११ मे १९९८ चा तो गौरवशाली दिवस आजही देशाच्या स्मरणात आहे, रालोआ सरकार स्थापन झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांनी पोखरणमध्ये यशस्वी अणुचाचणी झाली. त्याला 'ऑपरेशन शक्ती' असे नाव देण्यात आले. या चाचणीनंतर जगभरात भारतीय शास्त्रज्ञांविषयी चर्चा झाली. दरम्यान, अनेक देशांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली. मात्र तत्कालीन सरकारने कोणत्याही दबावाची पर्वा केली नाही. मागे हटण्याऐवजी १३ मे रोजी आणखी एक अणुचाचणी घेण्यात आली. ११ मे रोजी झालेल्या चाचणीने भारतीय शास्त्रज्ञांच्या सामर्थ्याची ओळख जगाला करून दिली होती. पण १३ मे रोजी झालेल्या चाचणीने जगाला दाखवून दिले की भारताचे नेतृत्व एका वेगळ्या मातीने बनलेले नेते करीत आहेत.

वाजपेयी सरकारच्या काळात सुरक्षेशी संबंधित अनेक आव्हाने होती. कारगिल युद्धाचा काळ आला. दहशतवाद्यांनी संसदेवर भ्याड हल्ला केला. अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यामुळे जागतिक परिस्थिती बदलली, परंतु प्रत्येक परिस्थितीत अटलजींसाठी भारत आणि भारताचे हित सर्वोच्च स्थानी राहिले. वाजपेयीजींच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल तुम्ही कोणाशीही बोलाल तेव्हा ते म्हणतील की ते लोकांना स्वतःकडे आकर्षित करायचे. त्यांचे वक्तृत्वकौशल्य अवर्णनीय होते. त्यांच्या कविता आणि शब्दांना तोड नव्हती. विरोधकही वाजपेयींच्या भाषणांचे चाहते होते. त्यांच्या त्या चर्चा तरुण खासदारांसाठी शिकण्याचे माध्यम होत्या.

अल्पसंख्येने खासदार असतानाही काँग्रेसच्या डावपेचांना कडाडून विरोध करण्यात ते यशस्वी ठरले होते. भारतीय राजकारणात प्रामाणिकपणा आणि धोरण स्पष्टता म्हणजे काय हे वाजपेयीजींनी दाखवून दिले. संसदेत बोललेले त्यांचे हे वाक्य...सरकारे येतील आणि जातील, पक्ष बनतील आणि बिघडतील, पण हा देश असाच राहिला पाहिजे... आजही ते एखाद्या मंत्राप्रमाणे आपल्या सर्वांच्या मनात गुंजत आहे.

त्यांना भारतीय लोकशाही नीटपणे समजली होती. लोकशाही बळकट राहणे किती महत्त्वाचे आहे, हेही त्यांना माहीत होते. आणीबाणीच्या काळात त्यांनी जुलमी काँग्रेस सरकारला प्रखर विरोध केला आणि अत्याचार सहन केले.



तुरुंगात गेल्यावरही त्यांनी संविधानाच्या रक्षणाच्या संकल्पाचा पुनरुच्चार केला. रालोआच्या स्थापनेनंतर त्यांनी युतीच्या राजकारणाची नव्याने व्याख्या केली. त्यांनी अनेक पक्षांना एकत्र आणून रालोआला विकास, देशाची प्रगती आणि प्रादेशिक आकांक्षांचे प्रतिनिधी बनवले.

पंतप्रधानपद भूषवताना त्यांनी विरोधकांच्या टीकेला नेहमीच बहारदार प्रत्युत्तरे दिली. त्यांना बहुतांश वेळा विरोधी पक्षात रहावे लागले, पण त्यांनी युक्तिवाद आणि शब्दांनी चुकीच्या धोरणांना विरोध केला. एकेकाळी काँग्रेसने त्यांना देशद्रोही म्हटले होते, तरीही त्यांनी कधीही असंसदीय शब्द वापरले नाहीत. त्यांना सत्तेची लालसा नव्हती. १९९६ मध्ये त्यांनी तोडफोडीचे राजकारण करण्याऐवजी राजीनाम्याचा मार्ग निवडला. राजकीय कारस्थानांमुळे त्यांना १९९९ मध्ये केवळ एका मताच्या फरकाने पदाचा राजीनामा द्यावा लागला होता. अनेकांनी त्यांना अशा अनैतिक राजकारणाला आव्हान देण्यास सांगितले, पण पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना शुचितेचे राजकारण पसंत होते. पुढच्या निवडणुकीत ते जोरदार जनादेश घेऊन परतले.

संविधानाची मूल्ये जपण्यातही त्यांच्यासारखा कोणीच नव्हता. डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या निधनाचा त्यांच्यावर मोठा परिणाम झाला होता. आणीबाणीविरुद्धच्या लढ्याचाही ते प्रमुख चेहरा बनले. आणीबाणीनंतर १९७७ च्या निवडणुकीपूर्वी त्यांनी 'जनसंघ' जनता पक्षात विलीन करण्याचेही मान्य केले. मला माहीत आहे की हा निर्णय कदाचित सोपा नसेल, पण वाजपेयीजींसाठी प्रत्येक देशभक्त कार्यकर्त्याप्रमाणे, पक्षापेक्षा देश मोठा होता, संघटनेपेक्षा संविधान मोठे होते.

आपल्या सर्वांना माहीत आहे की अटलजींना भारतीय संस्कृतीची खूप आवड होती. भारताचे परराष्ट्रमंत्री झाल्यानंतर संयुक्त राष्ट्रात भाषण देण्याची संधी आली तेव्हा त्यांनी संपूर्ण देशाला आपल्या हिंदीने जोडले. संयुक्त राष्ट्रात पहिल्यांदाच कोणीतरी हिंदीत बोलले होते. त्यांनी भारताचा वारसा जागतिक पटलावर ठेवला. सामान्य भारतीयाची भाषा त्यांनी संयुक्त राष्ट्रात आणली. राजकीय जीवनात आल्यानंतरही ते साहित्य आणि अभिव्यक्तीशी जोडलेले राहिले. ते एक असे कवी आणि लेखक होते, ज्यांचे शब्द प्रत्येक प्रतिकूल परिस्थितीत आशा आणि नवनिर्मितीची प्रेरणा देतात. प्रत्येक वयोगटाला आणि प्रत्येक वर्गाला ते आपलेसे आणि प्रिय होते.

माझ्यासारख्या भारतीय जनता पार्टीच्या असंख्य कार्यकर्त्यांना त्यांच्याकडून शिकण्याची, त्यांच्यासोबत काम करण्याची आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. आज भाजपा हा जगातील सर्वात मोठा पक्ष असेल तर त्याचे श्रेय ज्या भक्कम पायावर ही संघटना उभी आहे त्यालाच जाते. काँग्रेससारख्या पक्षाला पर्याय बनणे सोपे नसताना त्यांनी भाजपाचा पाया रचला. त्यांचे नेतृत्व, त्यांची राजकीय कुशाग्रता, धैर्य आणि लोकशाहीप्रती त्यांचे अतूट समर्पण यामुळे भारतातील लोकप्रिय पक्ष म्हणून भाजपाचा मार्ग मोकळा झाला. लालकृष्ण आडवाणी आणि डॉ. मुरली मनोहर जोशी यांसारख्या दिग्गजांसह त्यांनी पक्षाला अनेक आव्हानांमधून यशाच्या शिखरावर नेले.

जेव्हा जेव्हा त्यांच्यावर सत्ता आणि विचारधारा यापैकी एक निवडण्याची परिस्थिती आली, तेव्हा त्यांनी या निवडणुकीत खुल्या मनाने विचारधारा निवडली. काँग्रेसपेक्षा वेगळा पर्यायी जागतिक दृष्टिकोन शक्य आहे हे देशाला पटवून देण्यात ते यशस्वी झाले. असा दृष्टिकोन खरोखर परिणामकारक ठरू शकतो. त्यांनी लावलेले बीज आज वटवृक्ष बनून राष्ट्रसेवेची नवी पिढी घडवत आहे. अटलजींची १०० वी जयंती ही भारतातील सुशासनाच्या राष्ट्रीय पुरुषाची जयंती आहे. त्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून काम करण्याची ही संधी घेऊया. सुशासन, ऐक्य आणि प्रगतीच्या स्थिर तत्त्वांचे प्रतीक असलेला भारत घडवूया. मला विश्वास आहे की भारतरत्न अटलबिहारी वाजपेयीजी यांनी शिकवलेली तत्त्वे भारताला नवीन प्रगती आणि समृद्धीच्या मार्गावर नेण्यासाठी प्रेरणा देत राहतील. ■

पान १७ वरून

# 'बेटी बचाओ'ची १० वर्षे

## समाजाची मानसिकता बदलण्यात आणि सशक्तीकरणात ठरली सहाय्यक

■ ४ कोटींच्यावर पोहोचली सुकन्या समृद्धी खात्यांची संख्या

■ सुमारे १.५ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक ठेवी जमा झाल्या आहेत. चालू आर्थिक वर्षात ठेवींवरील व्याज ८.२% आहे.

■ 'महिलाभिमुख विकासाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात ३,००,००० कोटी रुपयांहून अधिक रकमेची तरतूद केली आहे.

■ ३३% जागा नारी शक्ती वंदन कायदा,२०२३ अंतर्गत राजधानी क्षेत्र दिल्लीसह लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी राखीव ठेवण्यता आल्या आहेत.

■ सैनिक स्कूल आणि राष्ट्रीय संरक्षण अकादमी म्हणजेच एनडीएमध्ये मुलींसाठी प्रवेशद्वार उघडले गेले

■ १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक भांडवल असणाऱ्या किंवा ३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल असणाऱ्या प्रत्येक सूचिबद्ध कंपनीमध्ये कमीतकमी एका महिला संचालकाची नेमणूक बंधनकारक करण्यात आली आहे.

■ सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी पत हमी योजनेअंतर्गत महिला उद्योजकांना वार्षिक हमी शुल्कात १० टक्के सवलत आणि १० टक्के अतिरिक्त हमी कवच प्रदान करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

■ स्टँड अप योजनेअंतर्गत प्रत्येक बँकेने किमान एका महिला कर्जदाराला १० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

■ सामाजिक सुरक्षा संहिता २०२० आणि वेतन संहिता २०१९ मध्ये अनुक्रमे महिला कर्मचाऱ्यांना मातृत्व लाभ आणि लिंगाच्या आधारावर भेदभाव न करण्याच्या तरतुदी आहेत.

■ मातृत्व लाभ (सुधारणा) कायदा २०१७ मुळे प्रसूती रजा १२ वरून २६ आठवड्यांपर्यंत वाढवली आहे तसेच ५० किंवा त्याहून अधिक कर्मचारी असलेल्या प्रत्येक आस्थापनामध्ये पाळणाघर सुविधेची तरतूद अनिवार्य आहे.

■ नोकरदार मातांना त्यांच्या मुलांची योग्य काळजी घेण्यासाठी डे केअर सुविधा आणि सुरक्षा प्रदान करण्यासाठी १ एप्रिल २०२२ पासून 'पाळणा' योजना सुरू करण्यात आली आहे.

देशभरात दरवर्षी २४ जानेवारीला कन्या दिवस साजरा केला जातो. मुलींना महत्व देऊन एका सकारात्मक वातावरणाची निर्मिती करण्यात संपूर्ण राष्ट्राला सामील करुन घेणे हा या मागील उद्देश आहे.

सुरुवातीला केवळ १०० कोटी रुपयांच्या आर्थिक बळावर सुरु झालेली ही योजना प्रामुख्याने उत्तर प्रदेश, हरयाणा, उत्तराखंड, पंजाब, बिहार आणि दिल्लीसारख्या लैंगिक असमानता असणाऱ्या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहे. असे असले तरी पश्चिम बंगाल व्यतिरिक्त देशभरात सर्वत्र ही योजना सुरू आहे. भारत सरकारच्या आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणालीनुसार, जन्माच्या वेळी लिंग गुणोत्तरामध्ये सुधारणा दिसून येत आहे. राष्ट्रीय स्तरावर २०१४-१५ मध्ये ९१८ असलेले लिंग गुणोत्तर २०२३-२४ मध्ये ९३० वर पोहोचले आहे.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ नुसार, रुग्णालयात होणाऱ्या प्रसूतीचे प्रमाण ८८.६ टक्क्यांवर पोहोचले आहे, तर बेटी बचाओ, बेटी पढाओच्या अंमलबजावणीनंतर १० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सुशिक्षित मुलींची संख्या १५% पेक्षा वाढली आहे. शालेय शिक्षणात, प्राथमिक ते उच्च माच्यमिक वर्गासाठी २०२१-२२ मध्ये मुलींची नोंदणी १२.२८ कोटी होती. हरियाणात, माध्यमिक स्तरावरील शाळांमध्ये २०१४ मध्ये मुलींची नोंदणी ७९.८६ टक्के होती, जी २०२१-२२ मध्ये ९३.२४ टक्के झाली आहे. १८७६ मधील पहिल्या राष्ट्रीय जनगणनेनंतर प्रथमच १,००० पुरुषांमागे महिलांची संख्या वाढली.

राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण-५ (वर्ष २०१९-२१) मध्ये प्रत्येक १,००० पुरुषांमागे १,०२० महिलांची नोंदणी झाली आहे.

राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण-३ मध्ये, दिलेल्या माहितीनुसार २०-२४ वर्षे वयोगटातील ४७ टक्के महिलांनी १८ वर्षे वयाच्या आधी विवाह केल्याचे नोंदवले, मात्र बेटी बचाओ, बेटी पढाओ योजनेच्या अंमलबजावणीनंतर आयोजित केलेल्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ मध्ये हे प्रमाण जवळपास निम्म्यावर आले आहे. ■

# भारताच्या संरक्षण क्रांतीची झेप



संरक्षण क्षेत्रात भारत आत्मनिर्भर होत आहे.गेल्या काही वर्षात सरकारने उचललेल्या पाऊलांमुळे भारत जागतिक उत्पादन केंद्र म्हणून पुढे येत आहे. एके काळी संरक्षण बजेटचा अधिकांश भाग परदेशांमधून शस्त्रास्त्रे, उपकरण आयात करण्यावर खर्च होत असे. मात्र विद्यमान सरकारने देशाला आत्मनिर्भर करण्यासाठी स्वदेशी उत्पादनावर लक्ष केंद्रित केले. यामध्ये अनेक सकारात्मक स्वदेशीवरण सूचीसाठीच्या अधिसूचनांचा समावेश आहे. यामध्ये ५६०० पेक्षा जास्त वस्तू आहेत ज्या निर्धारित काळानंतर फक्त भारतीय उद्योगांकडूनच खरीदल्या जातील.भारत जो पूर्वी संरक्षण सामग्रीच्या आयातीवर संपूर्णपणे अवलंबून होता,आज अनेक देशांना निर्यात करत आहे.

### संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेची प्राप्ती

सरकारच्या निरंतर प्रयत्नामुळे २०२३– २४ या वित्तीय वर्षात वार्षिक संरक्षण उत्पादन १.२७ लाख कोटी रुपयांच्या विक्रमी स्तरावर पोहोचली. त्याच वित्तीय वर्षात संरक्षण निर्यात २१,०८३ कोटी रुपयांच्या विक्रमी स्तरावर पोहोचले होती. २०२२–२३ या वित्तीय वर्षाच्या तुलनेत यात ३२.५ टक्के वाढ झाली आहे. याशिवाय २०२४–२५ या वित्तीय वर्षाच्या पहिल्या तिमाहीत संरक्षण निर्यातीत मोठी वाढ झाली आहे. पहिल्या तिमाहीत ६,९१५ कोटी रुपयांची संरक्षण सामग्री निर्यात करण्यात आली, ही निर्यात, २०२३–२४ या वित्त वर्षाच्या पहिल्या तिमाहीच्या ३,८८५ कोटी रुपयांच्या तुलनेत ७८ टक्के जास्त होती.

संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेला प्रोत्साहन म्हणजे भारताच्या प्रतिभेच्या नेतृत्वावरच्या विश्वासाची पुष्टी आहे. कोणत्याही शक्यतेचे समृद्धीत रुपांतर करण्यासाठी अचूक योजना आणि योग्य भागीदारीची आवश्यकता असते. भारताच्या संरक्षण क्षेत्राचा कायापालट याचेच उदाहरण आहे. गेल्या दशकात भारताने असे अनेक निर्णय घेतले ज्यामुळे भारतात संरक्षण उद्योगाचा जोमदार विकास झाला.केंद्र सरकारने हाच विचार घेऊन संरक्षण क्षेत्रात खाजगी भागीदारीचा विस्तार केला आणि सार्वजनिक क्षेत्र अधिक सक्षम केले. आयुध निर्मिती कारखान्यांचे सात मोठ्या कंपन्यांमध्ये रुपांतर केले, डीआरडीओ आणि एचएएलला बळकट केले, उत्तर प्रदेश आणि तामिळनाडू इथे दोन मोठे संरक्षण कॉरिडोर उभारले अशा अनेक निर्णयांनी संरक्षण क्षेत्रात नवी उर्जा आणली.

आय डेक्स (iDEX म्हणजे इनोव्हेशन फॉर डिफेन्स एक्सलन्स) यासारख्या योजनांनी स्टार्टअप्सना वेग दिला, गेल्या ५–६ वर्षात भारतात सुमारे १००० नवे संरक्षण स्टार्ट अप्स तयार झाले आहेत. गेल्या दहा वर्षात भारताची संरक्षण निर्यात ३० पटीने वाढली आहे. आज १०० पेक्षा जास्त देशांना आपण संरक्षण सामग्री निर्यात करत आहोत. २१ व्या शतकाच्या आवश्यकता लक्षात घेऊन आज आपण आपली सैन्यदले, सुरक्षा दले आधुनिक संसाधनानी सुसज्ज करत आहोत. जगातल्या सर्वात आधुनिक संरक्षण दलांच्या पंक्तीत आपण आपले सैन्यदल

नेत आहोत. संरक्षण क्षेत्रात होत असलेल्या या प्रयत्नांचा आधार आहे.

आत्मनिर्भर भारत. गुजरातमध्ये बडोदा इथे सी-२९५ कारखान्याचे नुकतेच उद्घाटन झाले. देशाकडे विक्रांतसारखी मेड इन इंडिया विमानवाहू युद्धनौका आहे.आज भारत आपल्या पाणबुड्या बनवत आहे. आपले तेजस लढाऊ विमान हवाई दलाचे सामर्थ्य बनत आहे. आज युद्धाचे स्वरूप बदलत आहे. सुरक्षेच्या नव-नव्या समस्या सामोऱ्या येत आहेत. भविष्यातल्या या समस्या अधिक जटील असतील. आज नव्या युगात आव्हाने वाढली असून ड्रोन तंत्रज्ञान त्याचे महत्वाचे साधन बनले आहे. युद्ध सुरु असलेले देश आज ड्रोन तंत्रज्ञानाचा मोठ्या वापर करत आहेत. ड्रोनद्वारे लक्ष ठेवण्यात येत आहे, गुप्त माहिती जमा करण्यात येत आहे. एखादे ठिकाण किंवा स्थान ओळखण्यासाठी आणि सामान पोहोचवण्यासाठी ड्रोनचा उपयोग होत आहे. हत्यार म्हणूनही ड्रोनचा उपयोग होत आहे. इतकेच नव्हे तर पारंपारिक हवाई संरक्षणासाठीही ड्रोन आव्हान ठरत आहे. अशा परिस्थितीमध्ये भारतही ड्रोन तंत्रज्ञानाच्या मदतीने आपली सैन्यदले, आपली सुरक्षादले सशक्त करत आहे. तीनही सैन्यदलांच्या उपयोगी ठरणारी प्रीडेटर ड्रोन सरकार खरेदी करत आहे. ड्रोन संबंधी धोरण आखले जात आहे. अनेक भारतीय कंपन्या पूर्ण स्वदेशी ड्रोन निर्मितीसाठी काम करत आहेत. यासाठी अनेक स्टार्ट अप्स काम करत आहेत.

### स्वदेशकरणातून संरक्षण क्षेत्रात समृद्धी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील संरक्षण सुधारणा आणि आत्मनिर्भरता या मूलमंत्रांचा आज परिणाम दिसत आहे. आत्मनिर्भर भारताविना विकसित भारत संकल्पना शक्य नाही. विकसित होण्यासाठी भारताला दुसऱ्यांवरचे आपले अवलंबित्व कमी करावेच लागेल म्हणूनच आज भारत, खाद्य तेलापासून ते लढाऊ विमानापर्यंत प्रत्येक क्षेत्रात आत्मनिर्भरतेवर भर देत आहे. आज मेक इन इंडियाचे यश सर्वासमोर आहे. भारतीय तोफा, रणगाडे, लढाऊ जहाज, हेलीकॉप्टर, क्षेपणास्त्र प्रणालीचा यांचा बोलबाला भारताच्या सामर्थ्याचा परिचय देत आहेत. शस्त्रात्रे आणि दारुगोळा, दुरसंवाद उपकरणे, सायबर आणि अंतराळापर्यंत मेड इन इंडियाची झेप आज

देश पहात आहे. आज वैमानिक भारतात तयार झालेले

**आता आम्ही आत्मनिर्भर बनू इच्छितो आणि मी आपल्या संरक्षण दलांना मनापासून धन्यवाद देऊ इच्छितो, हजारो अशा वस्तूंची सूची त्यांनी तयार केली आहे, ज्या परदेशातून आणणार नाही असा निश्चय त्यांनी केला आहे. राष्ट्रासाठी जीवन म्हणजे काय हे आपल्या सेन्याच्या जवानांनी दाखवले आहे. यामुळे संरक्षण क्षेत्रामध्ये आपण आत्मनिर्भर होऊ लागलो आहोत. - नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

'तेजस' लढाऊ विमान, प्रगत हलक्या वजनाचे हेलीकॉप्टर, हलक्या वजनाचे लढाऊ हेलीकॉप्टर यांच्यासह भरारी घेत आहेत. संपूर्णपणे भारतात तयार झालेली पाणबुडी, विमानवाहू युद्ध नौका सागर लहरींवर स्वार होत आहेत. थल सेनेचे जवान, भारतात निर्मिती झालेले आधुनिक अर्जुन रणगाडे आणि तोफा यांचा वापर करत देशांच्या सीमांचे रक्षण करत आहेत.

संरक्षण क्षेत्रात देश आत्मनिर्भर व्हावा यासाठी गेल्या १० वर्षात लागोपाठोपाठ मोठ-मोठी पाऊले उचलण्यात आली. धोरणात्मक सुधारणा घडवनाच संरक्षण क्षेत्राशी खाजगी क्षेत्र जोडण्यात आले. एमएसई स्टार्ट अप्सना प्रोत्साहन देण्यात आले. उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये संरक्षण कॉरीडॉर तयार करण्यात येत आहे. यामध्ये आतापर्यंत ७ हजार कोटी रूपयांपेक्षा जास्त गुंतवणूक झाली आहे. हेलीकॉप्टर तयार करणारा आशियातला सर्वात मोठा कारखाना, भारतात कार्यरत होत आहे. तीनही सैन्य दलांनी शेकडो सामग्रीची सूची तयार केली असून या गोष्टी आता परदेशातून मागवायच्या नाहीत असा निश्चय केला आहे. भारतीय शस्त्रास्त्र परिसंस्थेसाठी सैन्य दलांनी सहयोग केला. आता सैन्य दलांसाठी शेकडो उपकरणे भारतीय कंपन्यांकडून खरेदी केली जात आहेत.

१० वर्षात सुमारे ६ लाख कोटी रुपयांची संरक्षण उपकरणे स्वदेशी कंपन्यांकडूनख खरेदी करण्यात आली आहेत. या दहा वर्षात देशाचे संरक्षण उत्पादन, दुपटीहून जास्त म्हणजे १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे. गेल्या दहा वर्षात १५० पेक्षा जास्त नवे स्टार्ट अप्स सुरु झाले आहेत. यांना १८०० कोटी रुपयांची ऑर्डर देण्याचा निर्णय सैन्यांनी घेतला आहे. **(पूर्वार्ध)**

# चीन प्रेमाचा काँग्रेसी उमाळा

‘भारताला चीनकडून कोणत्याच प्रकारचा धोका नसून भारताने चीन बरोबरचे सहकार्य वाढविले पाहिजे’, हे कोणा चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्याचे वक्तव्य नसून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते सॅम पित्रोदा यांचे हे बोल आहेत. ‘भारताने आक्रमक व्हावे, असे चीनबरोबरचे कोणतेही वादाचे विषयच नाहीत’, असेही सॅम पित्रोदा यांनी सांगून टाकले आहे.



**काँग्रेसचे** युवराज राहुल गांधी यांनीही पित्रोदा यांच्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर चीनवर स्तुतीसुमने उधळली होती. त्यामुळे पित्रोदा यांनी आपल्या पक्षाची भूमिका नव्याने मांडली आहे, असेच म्हणावे लागते. पित्रोदा यांच्या मुक्ताफळानंतर देशभर संतापाची लाट उसळली. परिणामी काँग्रेस नेतृत्वाने तातडीने खुलासा करत पित्रोदा यांच्या मतांशी पक्ष सहमत नसल्याचे सांगून टाकले. पण यातून काँग्रेस नेत्यांना चीनविषयी मनातून किती प्रेम आहे, हे पुन्हा एकदा दिसून आले.मोदी सरकार आणि भारतीय जनता पार्टीला विरोध करीत असताना काँग्रेस नेते चीनसारख्या देशाची भलामण करू लागले आहेत. पित्रोदा जे काही बोलले ते अत्यंत निषेधार्ह आहे. काँग्रेस नेतृत्वाचे चीनबरोबर असलेले लागेबांधे काँग्रेसला चीनकडून मिळालेल्या देणग्यांमुळे स्पष्ट झाले होते. पित्रोदा यांनी काँग्रेस नेतृत्वाच्या पावलावर पाऊल टाकत आपला देशविरोधी दृष्टीकोन दाखवून दिला आहे. गेल्या १० वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत सर्वांगीण प्रगती करत असताना आणि आंतरराष्ट्रीय पटलावर आपले मजबूत स्थान निर्माण करत असताना अनेक देश आणि विदेशी शक्तींचे हितसंबंध धोक्यात आले आहेत. त्यामुळे या बड्या शक्ती भारताच्या विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण करण्याचे प्रयत्न करीत आहेत. मनमोहन सिंग सरकार सत्तेत असताना ७ ऑगस्ट २००८ रोजी चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने काँग्रेसशी करार केला होता. त्या करारावर काँग्रेस पक्षाच्या वतीने राहुल गांधी यांनी तर चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने शी जिनपिंग यांनी स्वाक्षरी केली होती. या करारातील माहिती काँग्रेस अथवा गांधी परिवाराने कधीच सार्वजनिक केली नाही.

१९६२ च्या आक्रमणापासून चीनने आपला भारतविरोधी दृष्टीकोन अनेकदा दाखवला आहे. भारताचा भूभाग बळकावण्याचे चीनने अनेक प्रयत्न केले आहेत. त्याचबरोबर चीनने पाकिस्तानलाही आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर अनेकदा सहकार्य केले आहे. अशा चीनला शत्रू समजू नका, तो आपला मित्र देश आहे, असा सल्ला सॅम पित्रोदा यांनी दिला आहे. चीनमध्ये कम्युनिस्ट पक्षाची राजवट आहे. चीनमध्ये वृत्तपत्रे, दूरचित्रवाहिन्या, अन्य प्रसारमाध्यमे यांच्यावर अनेक बंधने आहेत. अनेक आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थांना चीनमध्ये वार्तांकन करण्यास बंदी केली जाते. चीनच्या कम्युनिस्ट पक्षाविरोधात तेथील सामान्य माणसाला आपले मत खुलेपणाने व्यक्त करता येत नाही. चीनमधील अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर किती बंधने आहेत, हे सार्या जगाला ठाऊक आहे. असे असताना युवराज राहुल गांधी यांनी भारतापेक्षा चीनमध्ये



राजीव गांधी फाऊंडेशनला चीन दुतावासाकडून मिळालेले अर्थसहाय्य, काँग्रेसने चीनच्या कम्युनिस्ट पक्षाबरोबर केलेला करार याच्या मोबदल्यात राहुल गांधी, सॅम पित्रोदा हे चीनच्या आरत्या ओवाळत आहेत. चीन सरकारकडून अर्थसहाय्य मिळाल्याचे

प्रसारमाध्यमांना अधिक स्वातंत्र्य आहे, असे वक्तव्य जाहीरपणे केले होते. चीनचे संरक्षण मंत्री अचानक गायब झाले, चीनचे परराष्ट्रमंत्री असेच अचानक गायब झाले. चीनमधील सर्वात मोठी कंपनी असलेल्या अलिबाबा कंपनीचा प्रमुखही रहस्यमय रित्या बेपत्ता झाला. या घटनांबाबत चीनमधील कम्युनिस्ट राजवटीकडून कसलेही स्पष्टीकरण दिले गेले नाही.

मोदी सरकारने गेल्या १० वर्षात चीनबरोबर चांगले संबंध निर्माण करण्यास प्राधान्य दिले आहे. मात्र चीनबरोबर चांगले संबंध निर्माण करत असताना भारताच्या स्वाभिमानाशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, हे मोदी सरकारने चीनला अनेकदा ठणकावून सांगितले आहे. ५ वर्षांपूर्वी चीनच्या सैन्याने लडाखमधील गलवान खोऱ्यात घुसखोरी केली होती. चीनच्या सैन्याची घुसखोरी भारतीय सैन्याने प्रचंड प्रतिकार करत रोखली. या संघर्षात भारताचे २० जवान हुतात्मा झाले. अशा चीनबरोबर मित्रत्वाचे संबंध निर्माण करण्याचा सल्ला पित्रोदांनी दिला आहे. चीनबरोबर आपले शत्रुत्व नाही, असे म्हणणार्या पित्रोदा यांनी २० भारतीय जवानांच्या हौतात्म्याचा अवमानच केला आहे.

गलवान खोऱ्यात चीनने केलेल्या घुसखोरी विरोधात लढताना भारतीय जवानांनी आपल्या प्राणाची पर्वा केली नाही. तरीही त्यावेळी काँग्रेस नेतृत्वाने भारतीय लष्कराच्या शौर्याबाबत शंका उपस्थित केली होती. काँग्रेसला भारतीय लष्कराचा अपमान करण्याची सवय आहे. मोदी सरकारला विरोध करताना आपण भारतीय लष्कराचा अवमान करून जागतिक पातळीवर भारताची प्रतिमा मलिन करत आहोत, याचेही भान काँग्रेस नेतृत्वाने कधीच ठेवले नाही.

राजीव गांधी प्रतिष्ठानने आपल्या वार्षिक आयकर विवरण पत्रातच कबुल केले आहे.

चीनकडून देणगी मिळाल्यावर राजीव गांधी प्रतिष्ठानने भारत आणि चीनमधील उद्योगांना तंत्रज्ञान हस्तांतरण या सारख्या विषयावर अभ्यास प्रकल्प सुरु केले होते. २००९-१० मध्ये प्रतिष्ठानने दिलेल्या फेलोशिपद्वारे मोहम्मद साकिब यांनी भारत-चीन यांच्यातील मुक्त व्यापार कराराची व्यवहार्यता तपासणारे संशोधन केले. मागील वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीवेळी काही आंतरराष्ट्रीय संस्थांनी भारतातील संस्था आणि संघटनांना मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य केले होते, असे अलिकडेच उघडकीस आले आहे. अमेरिकेचे नवे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीच हा आरोप केला आहे. बायडेन प्रशासनाने भारताच्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी २१ दशलक्ष डॉलर्स एवढा प्रचंड निधी खर्च केल्याचे ट्रम्प यांनी सांगितले आहे.

अमेरिकेच्या करदात्यांचा पैसा अशा पद्धतीने खर्च करण्याचा अधिकार बायडेन प्रशासनाला कोणी दिला, अशा शब्दात ट्रम्प यांनी भारतविरोधी शक्तींच्या कारवायांवर प्रकाशझोत टाकला आहे. भारतातील कोणत्या शक्तींना 'यूएसएड'च्या माध्यमातून निधी मिळाला? काही दिवसांपूर्वी जॉर्ज सोरोस या अब्जाधीश उद्योगपतीने वेगवेगळ्या संस्थांच्या माध्यमातून भारतात अनेक संघटना, संस्था यांना निधी दिल्याचे जाहीर झाले होते. सॅम पित्रोदा, जॉर्ज सोरोस आणि यूएसएड ही भारतविरोधी साखळी विविध माध्यमातून भारताच्या विकासाच्या गतीमध्ये अडथळे आणण्याचे काम करत आहे, असे या घडामोडींतून स्पष्ट होते. ■

# दिल्लीची नवीन कप्तान...




● डॉ. सुकृत खांडेकर

> तब्बल २७ वर्षांनी दिल्लीत भाजपाची सत्ता स्थापन झाली. विधानसभा निवडणुकीत मतदारांनी दिल्ली विधानसभेच्या ७० पैकी ४८ जागांवर भाजपाचे आमदार निवडून दिले. भाजपाला सरकार स्थापनेचा स्पष्ट जनादेश मिळाला आणि अरविंद केजरीवाल यांना व त्यांच्या आम आदमी पक्षाला मतदारांनी नाकारले. काँग्रेसला सलग तिसऱ्या निवडणुकीत विधानसभेत खातेही उघडता आले नाही. केजरीवाल यांच्या पराभवाने आप च नव्हे तर विरोधी पक्षालाही मोठा झटका बसला.

**रेखा** गुप्ता यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्याचे जाहीर होताच एक महिला दिल्लीची मुख्यमंत्री झाली याचा जसा सर्वांना आनंद झाला तसाच प्रथमच आमदार झालेल्या रेखा यांची पक्ष श्रेष्ठींनी दिल्ली राज्याच्या सर्वोच्च पदासाठी निवड केली म्हणून अनेकांना आश्चर्याचा धक्काही बसला. सन २०१४ पासून मोदी-शहांच्या नेतृत्वाखाली भाजपाचा अश्वमेध देशभर दौडत आहे. देशात २१ राज्यांत भाजपा सत्तेवर आहे. केंद्रातही भाजपाने सरकार स्थापनेची व मोदींनी पंतप्रधानपदाची हॅटट्रीक संपादन केली आहे. राज्यात सत्ता मिळाल्यावर भाजपाने अनेक नवे चेहरे मुख्यमंत्रीपदावर बसवले.

मध्य प्रदेशात मोहन यादव, राजस्थानात भजनलाल शर्मा, हरयाणात सुरुवातीला मनहरलाल खट्टर व नंतर नायबसिंग सैनी, ओडिसामधे मोहन माझी, छत्तीसगडमध्ये विष्णुदेव साय आणि आता दिल्लीत रेखा गुप्ता यांच्यावर मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सोपवून नवे चेहरे सत्तेच्या सर्वोच्च पदांवर आणले. सन २०१७ मध्ये उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदावर योगी आदित्यनाथ व सन २०२१ मध्ये गुजरातच्या मुख्यमंत्रीपदावर भूपेंद्र पटेल यांची निवड झाल्यावरही अनेकांना आश्चर्य वाटले होते. रेखा गुप्ता या भाजपाच्या व एनडीएच्या एकमेव महिला मुख्यमंत्री आहेत. सध्या दोनच राज्यांत महिला मुख्यमंत्री आहेत. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी आणि आता दिल्लीत रेखा गुप्ता.

चौधरी चरणसिंग विद्यापीठाच्या दौलतराम कॉलेजमध्ये विद्यार्थी असताना १९९२ मध्ये रेखा गुप्ता यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत कार्यकर्ता म्हणून प्रवेश केला. १९९५ मध्ये त्या संघटनेच्या सरचिटणीस झाल्या. १९९६ मध्ये संघटनेत अध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारली आणि नंतर राजधानी दिल्लीत भाजपाच्या कार्यकर्त्या, पदाधिकारी व लोकप्रतिनिधी म्हणून त्या राजकारणात सक्रिय झाल्या. दिल्लीच्या सार्वजनिक जीवनात तब्बल तीन

वेळा नगरसेवक म्हणून त्या महानगर परिषेदवर निवडून आल्या. अडीच दशकांच्या काळात दिल्ली प्रदेश भाजपामध्ये विविध पदांवर काम करताना त्यांनी आपला ठसाही उमटवला. निवडणुकीच्या राजकारणात त्यांनी पराभवही पचवले. दिल्लीच्या नवव्या मुख्यमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. विद्यार्थी नेता ते मुख्यमंत्री असा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहेच पण त्यांच्यातील निष्ठावान व प्रामाणिक कार्यकर्ता सदैव सज्ज आहे.

रेखा गुप्ता यांचा जन्म हरयाणातील जिंदमध्ये १९७४ मध्ये झाला. त्यांचे वडील जय भगवान जिंदाल यांची दिल्लीला स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पितमपुरा शाखेचे ब्रँच मॅनेजर म्हणून बदली झाली तेव्हापासून त्यांचा परिवार दिल्लीला राहायला आला. याच पितमपुरा मतदारसंघातून रेखा गुप्ता पुढे भाजपाच्या नगरसेवक झाल्या व त्यांनी दिल्ली विधानसभेची निवडणूकही लढवली. आपच्या उमेदवाराकडून त्या दोन वेळा पराभूतही झाल्या, पण यंदा त्या चांगल्या मतांनी निवडून आल्या.

रेखा गुप्ता यांची दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदावर निवड करून भाजपाने आपण कार्यकर्त्यांना महत्त्व देतो व त्यांच्या पाठीशी उभे राहतो असा संदेश दिला आहे. भाजपाने सदैव संघटना मजबूत करण्यावर भर दिला आहे. प्रत्येक निवडणूक जिंकण्यासाठी लढवायची व प्रत्येक निवडणुकीत मतांची टक्केवारी वाढवायची हे भाजपाचे सूत्र असते. शीला दीक्षित यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस दिल्लीत सलग १५ वर्षे सत्तेवर होती. केजरीवाल यांचा पक्ष ११ वर्षे दिल्लीत सत्तेवर होता. पण त्यांनी सत्तेवर येऊनही संघटना बांधणीकडे पुरेसे लक्ष दिले नाही. रेखा गुप्ता यांच्या मुख्यमंत्रीपदाचा शपथविधी सोहळा दिल्लीच्या ऐतिहासिक रामलीला मैदानावर दिमाखात पार पडला. एनडीएचे देशभरांतील सारे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री तसेच मोदी-शाह व केंद्रीय मंत्री या सोहळ्याला हजर होते. याच रामलीला मैदानावर काही वर्षांपूर्वी डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात यूपीएचे सरकार असताना अण्णा हजारे यांनी लोकपाल नियुक्तीसाठी आंदोलन केले होते. अण्णा हजारे यांच्या आंदोलनातूनच अरविंद केजरीवाल यांचे नेतृत्व आले. याच आंदोलनाचा राजकीय लाभ उठवून केजरीवाल यांनी आम आदमी पक्षाची स्थापना केली. अण्णा हजारे यांचा विरोध झुगारून त्यांनी राजकारणात प्रवेश केला व विधानसभा निवडणूक लढवून दिल्लीची सत्ता काबीज केली. एक तपापूर्वी ज्या जनतेने केजरीवाल व त्यांच्या पक्षाला पाठिंबा दिला होता, तीच जनता विशेषत: मध्यमवर्गीय मतदार आज भाजपाच्या पाठीशी मोठ्या विश्वासाने उभा आहे. याच जनतेने दिल्लीतील सर्व सात जागांवर गेल्या तीनही निवडणुकीत भाजपाचे सर्व खासदार लोकसभेवर निवडून दिले, याच जनतेने आता भाजपाला दिल्ली राज्याची सत्ता दिली आहे. म्हणूनच भाजपाने नव्या सरकारचा शपथविधी रामलीला मैदानावर मोठ्या थाटात साजरा केला.

दि. ८ फेब्रुवारीला निवडणूक निकालानंतर भाजपाच्या मुख्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत विजयोत्सव साजरा करण्यात आला तेव्हा, जय यमुना अशा घोषणा दिल्या गेल्या. रेखा गुप्तांनी शपथविधिनंतर मंत्रिमंडळासह यमुना नदीच्या घाटावर जाऊन आरती केली. स्वच्छ व प्रदूषणमुक्त यमुना करण्याचे आश्वासन भाजपाने दिले आहे. सन २०१५ मध्ये आपने स्वच्छ यमुना बनविण्याचे आश्वासन दिले होते, पण यमुना कधी स्वच्छ झालीच नाही. कचरा, घाणपाणी, नदी किनाऱ्यावरील अनधिकृत उद्योग व अनधिकृत वसाहतींचे पाणी या नदीत अखंड पडत असते. काँग्रेस किंवा आप यांना सत्तेवर असताना जमले नाही, ते यमुना नदी स्वच्छ व प्रदूषणमुक्त करणे हे भाजपापुढे मोठे आव्हान आहे.

आप सत्तेवर असताना मोफत वीज व पाणी सवलतीमुळे दहा हजार कोटींचा बोजा दिल्लीच्या सरकारी खजिन्यावर पडत असतो. या सवलती चालूच ठेवण्यात येतील, असे भाजपाने आश्वासन दिले आहे. दिल्लीची हवा वारंवार प्रदूषित होते,वर्षानुवर्षे हेच चालू आहे. राजधानीतील रस्ते खराब आहेत. ८० लाखांपेक्षा जास्त वाहनांनी या महानगरात वाहतुकीची कोंडी केली आहे. महिलांची सुरक्षा हा मोठा चिंतेचा विषय आहे. रोजगारासाठी रोज परप्रांतीयांचे लोंढे दिल्लीवर वर्षानुवर्षे आदळत आहेत. रोज येणाऱ्या हजारो लोकांची पार्श्वभूमी काय याची कोणतीही माहिती पोलीस-प्रशासनाला नसते. बेरोजगारी ही दिल्लीची मोठी समस्या आहे. सरकारी शाळा व सरकारी इस्पितळांतील सेवेची गुणवत्ता वाढवणे हे मोठे आव्हान आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर खासगी क्षेत्राने मोठा कब्जा केला आहे. या समस्या सोडवताना भाजपा सरकारच्या कप्तान म्हणून रेखा गुप्ता यांना काही कठोर निर्णय घेणेही आवश्यक आहे. ■

# स्टार्टअप बनतोय नवीन भारत

२०१४ साली देशातील एकंदर वातावरण बदलले, तेव्हा अनेक नवे शब्द पहिल्यांदाच ऐकायला मिळाले! स्टार्टअप-नवंउद्योग... हा असाच एक शब्द आहे... पण नवोन्मेष (इनोव्हेशन) आणि या नवकल्पनांची पोषक वातावरणाद्वारे वास्तवात पूर्तता (इन्क्युबेशन) यांच्या माध्यमातून तरुणाईच्या स्वप्नांचे नशीब बदलण्यावर विश्वास ठेवणाऱ्या केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळे भारत आता याबाबतीत दीड लाखांपेक्षा जास्त स्टार्ट अप्स सह जगात तिसऱ्या क्रमांकाची मजबूत व्यवस्था आहे. स्टार्टअप इंडियाच्या माध्यमातून हे शक्य झाले आहे... तुमच्या आशांना नवे पंख देणारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या उपक्रमाला १६ जानेवारी २०२५ रोजी ९ वर्षे पूर्ण झाली.




**भारतासारखा** तरुण देश, जिथे ६५ टक्के लोकसंख्येचे सरासरी वय ३५ वर्षे आहे, तिथे या तरुणाईच्या स्वप्नांच्या आकांक्षांना अधिक उत्तम आणि योग्य मार्ग दाखवण्याची आवश्यकता होती. १५ ऑगस्ट २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून 'स्टार्टअप इंडिया'ची घोषणा केली आणि या विचारसरणीला आणि इच्छेला खरा मार्ग सापडला. दिशा मिळाली. जवळपास पाच महिन्यांतच, १६ जानेवारी २०१६ रोजी औपचारिकपणे या मोहिमेचे उद्घाटन करताना ते म्हणाले, ज्यांना काहीतरी करायचे असते, त्यांच्या आड कधी पैसा येत नाही. जो ते करतो त्यालाच समजते की पुढे काय होणार आहे. माझे स्वप्न हेच आहे की, तरुणाईने नोकरीचे याचक बनण्यापेक्षा, नोकरी दाता बनले पाहिजे.

आज १.५४ लाखांहून अधिक स्टार्टअप्स तसेच ११८ हून अधिक युनिकॉर्न (एक अब्ज डॉलर्स पेक्षा जास्त उलाढाल करणारा खाजगी मात्र शेअर बाजारात सूचीबद्ध नसलेला नवंउद्योग) 'स्टार्टअप इंडिया'ची यशोगाथा सांगत आहेत. सोप्या शब्दात सांगायचे झाले तर, स्टार्टअप म्हणजे, दैनंदिन समस्यांचे नवकल्पनांद्वारे निराकरण करणारी नवीन कंपनी सुरू करणे. अशा कंपन्या तरुण उद्योजक स्वत: किंवा दोन-तीन लोकांसह सुरू करू शकतो. भारत आज जर जागतिक स्टार्टअप्सच्या जगतासाठी एक नवीन आशा, एक नवीन शक्ती म्हणून उदयास आला असेल, तर त्यामागे एक विचारपूर्वक दूरदृष्टी आहे.

भारताने योग्य वेळी योग्य निर्णय घेतले आणि योग्यवेळी स्टार्टअप्सवर काम सुरू केले. देशाने स्टार्टअप इंडिया मोहिमेअंतर्गत नाविन्यपूर्ण कल्पनांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले, त्यांना निधींचे स्रोत मिळवून दिले आणि शैक्षणिक संस्थांमध्ये अटल टिंकरिंग लॅब (नवोन्मेष विकास कार्यशाळा) सारखी नवकल्पनांची पोषक वातावरणाद्वारे वास्तवात पूर्तता करणारी सर्वोत्तम केंद्र (इनक्यूबेटर) स्थापन करण्याची मोहीम सुरू केली. आज संपूर्ण देश अभिमानाने सांगू शकतो की स्टार्टअप परिसंस्था केवळ मोठ्या महानगरांपुरती मर्यादित नाही. ती देशातील ६०० हून अधिक जिल्ह्यांमध्ये पोहोचली आहे. भारताच्या स्टार्टअप क्रांतीचे नेतृत्व आज देशाच्या लहान शहरातील

तरुणाई करत आहे. काही लोकांना असे वाटते की, स्टार्टअप केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित आहेत. पण वास्तव हे आहे की, आज शेती, वस्त्रोद्योग, औषध, वाहतूक आणि अंतराळ याबरोबरच योग आणि आयुर्वेदाच्या क्षेत्रातही स्टार्टअप सुरू झाले आहेत.

आज प्रशिक्षणाबरोबरच युवकांना स्टार्ट अप इंडिया अभियानाच्या माध्यमातून आर्थिक मदत पुरवली जात आहे, करामध्येही सूट दिली जात आहे. युवकांना व्यवसायासाठी २० लाख रुपयांपर्यंत मुद्रा कर्जाची सोयही करण्यात आली आहे. नव्या कंपन्यांसाठी देशभरात तंत्रज्ञान पार्क आणि नवी माहिती तंत्रज्ञान केंद्रे बनवण्यात येत आहेत. सरकारने एक लाख कोटी रुपयांचा संशोधन निधीही तयार केला आहे. म्हणजेच करिअरच्या प्रत्येक टप्प्यावर सरकार युवकांसमवेत असून त्यांच्या गरजांनुरूप काम करत आहे.

## नव भारताचा आधारस्तंभ बनले स्टार्ट अप –युनिकॉर्न

नाविन्यपूर्ण गोष्टी करण्याची, कल्पकतेने समस्यांचे निराकरण करण्याची इच्छाशक्ती भारतात नेहमीच राहिली आहे मात्र २०१४ पूर्वी समस्यांचे नव्या आणि कल्पक पद्धतीने निराकरण वास्तवात साकारण्यासाठी देशाच्या नेतृत्वाने असे वातावरण आणि स्पष्ट धोरण दिले नव्हते. २०१४ मध्ये नेतृत्व बदलले आणि देशात नव कल्पना आणि भक्कम स्टार्ट अप परिसंस्था उभारण्याची सुरवात झाली. स्टार्ट अप इंडिया कार्यक्रमाच्या ९ वर्षांच्या कालखंडात स्टार्ट अप ची कहाणी बदलली आहे. 'भारतासाठी नवोन्मेश' आणि भारताचा नवोन्मेश' हा मंत्र घेऊन स्टार्ट अप भारताचे आधार स्तभ बनत आहेत आणि जगाचे नेतृत्वही करत आहेत. स्टार्ट अप्सचे वाढते प्राबल्य आणि कार्य संस्कृती देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यासाठी पंतप्रचान नरेंद्र मोदी यांनी १६ जानेवारी २०२२ हा दिवस राष्ट्रीय स्टार्ट अप दिवस म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. देश या वर्षी चौथा राष्ट्रीय स्टार्ट अप दिवस साजरा करत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०१४ मध्ये सरकारने काम सुरु केले तेव्हा देशात ५०० पेक्षा कमी स्टार्ट अप होते. हा शब्दही क्वचितच ऐकायला मिळत असे; मात्र केवळ ९ वर्षांच्या छोट्या कालखंडात भारतात स्टार्ट अपचे जग बदलले आहे. देशातल्या ६५६ जिल्ह्यांमध्ये मान्यताप्राप्त दीड लाखाहून जास्त स्टार्ट अपसह भारत जगातली सर्वात मोठी तिसरी स्टार्ट अप परिसंस्था आहे. दर ८–१० दिवसात एक स्टार्ट अप युनिकॉर्नमध्ये परिवर्तीत होत आहे. देशामध्ये ११८ पेक्षा जास्त युनिकॉर्न बनले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी नव्या शतकाला डिजिटल क्रांती आणि नव्या युगाच्या नवोन्मेशाचे शतक मानतात. स्टार्ट अप त्यांच्या प्राधान्यांपैकी आहे. याच कारणाने भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जी–२० शिखर परिषदेत भारतीय स्टार्ट अप्सना आंतरराष्ट्रीय मंच देण्यासाठी एक सहभागी समूह स्टार्ट अप–२० स्थापन करण्यात आला. भविष्य म्हणून भारत स्टार्ट अप जगताकडे पहात आहे. देशात प्रथमच भारतीय अंतराळ संशोधन केंद्र इस्रोकडून खाजगी रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण म्हणजे भारतातल्या स्टार्ट अप्सच्या उदार धोरणाचे प्रमाण आहे. भारत एक अशी स्टार्ट अप परिसंस्था बनण्याचा प्रयत्न करत आहे ज्याचा आधार स्तंभ– 'तरुणांचा, तरुणांकडून, तरुणांकरिता' हा मंत्र असेल.

## युवा स्वप्नांच्या भरारीचा मार्ग

महाराष्ट्रातल्या पुण्यात राहणाऱ्या मयूर पाटीलच्या मनात २०११ मध्ये आपल्या मोटारसायकलचे मायलेज वाढवण्याचा विचार आला. त्याचे प्रयत्न यशस्वीही झाले. २०१७–१८ मध्ये त्याने असे तंत्रज्ञान विकसित केले ज्या द्वारे ४० टक्क्यापर्यंत उत्सर्जन कमी करण्यात यश मिळाले. २०२१ मध्ये त्याने त्याचे पेटंटही घेतले. अटल न्यू इंडिया चॅलेंजमधून ९० लाख रुपयांचे अनुदान मिळाल्यानंतर मयूर आता आपल्या चार मित्रांसह स्वतःचा स्टार्ट अप चालवत आहे.

मयूरसारखीच कहाणी अहमदाबादच्या अंगद सिंह यांचीही आहे. अंगद यांनी माल वाहतुकीच्या संकेत स्थळासमवेत एक स्टार्ट अप सुरु केला. यश मिळाल्यानंतर अंगदचे काही मित्रही नोकरी सोडून त्याच्या समवेत आले. काही वर्षापूर्वी कोणी म्हणाले असते की त्याला व्यापार करायचा आहे किंवा एखादी नवी कंपनी सुरु करायची आहे तर, कुटुंबातले वयस्क, मित्र, नातेवाईक यांनी त्याला रोखले असते; मात्र आज कोणी कंपनी सुरु करायची इच्छा दर्शवली तर आजूबाजूचे लोक उत्साहाने त्याला पाठिंबाही देतात. आज हे शक्य होत आहे त्याचे कारण आहे स्टार्ट अप इंडिया. **(पूर्वार्ध)**

# २० लाख लाभार्थ्यांना एकाच वेळी घरकुल मंजुरीचे पत्र

**● प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या अनुदानात ५० हजारांची वाढ,**
**● १० लाख लाभार्थ्यांना प्रथम हप्त्याचे वितरण**
**● मोफत वीजेसाठी सौर पॅनलकरीता अनुदान देणार**



> प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्राला सर्वात जास्त घरे देण्यात आली आहेत. महाराष्ट्रात २० लाख लाभार्थींना एकाच वेळी घरकुल मंजुरीचे पत्र देण्यात येत आहे. वीस लाख कुटुंबांच्या जीवनात एकाच वेळी आनंद निर्माण करण्याचा हा क्षण अत्यंत दुर्मिळ व ऐतिहासिक आहे, येणारी दिवाळी तुमच्या नवीन घरात सुखा-समाधाने साजरी करा आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या स्वप्नाकरीता आपण व आपल्या भावी पिढीने भरीव योगदान द्यावे, असे आवाहन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी केले.

**ग्रामविकास** व पंचायत राज विभागाच्यावतीने प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोन अंतर्गत २० लाख लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्राचे वाटप आणि १० लाख लाभार्थ्यांना प्रथम हप्त्याचे वितरण कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, माधुरी मिसाळ, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ मोफत वीजेसाठी, सौर पॅनलकरीता अनुदान देण्याचा निर्णय जाहीर केला.

देशात ‘सर्वांसाठी घरे’ या धोरणाच्या माध्यमातून महिला अशा सर्व घटकांना घरकुले देण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या माध्यमातून सन २०२९ पर्यंत देशात पाच कोटी घरे देण्यात येणार असून यापैकी तीन कोटी ८० लाख घरे बांधून पूर्ण झाली आहेत. महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात १३ लाख ५७ हजार घरकुले मंजूर करण्यात आली असून आता दुसऱ्या टप्प्यात २०



लाख घरे देण्यात येत आहेत. ही सर्व घरे वेळेत पूर्ण करण्याचे नियोजनही महाराष्ट्र शासनाने केले आहे.

श्री. शाह म्हणाले शासन महाराष्ट्रासाठी अनेक पायाभूत प्रकल्प साकारत आहे. महाराष्ट्र शासनही अनेक मोठे प्रकल्प राबवित आहे. जलसिंचन योजना अंतर्गत गोसीखुर्द या प्रकल्पांबरोबरच जलयुक्त शिवारसारख्या योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्राला दुष्काळमुक्तीकडे नेले आहे. नदीजोड प्रकल्पांतर्गत नारपार या नद्यांची कामे सुरू आहेत. ११ वंदे भारत रेल्वे गाड्या सुरू झाल्या आहेत. अमृत भारत योजनेअंतर्गत १३८ रेल्वे स्टेशनचे पुनर्निर्माण झाले आहे. मुंबईमध्ये मेट्रो रेल्वेची कामे गतीने आहेत. शिर्डीमध्ये नवीन विमानतळ होत आहे. १३ हजार कोटी रुपये खर्च करुन मरीन ड्राईव्ह सि लिंक जोडण्यासाठी मुंबई कोस्टल रोडची निर्मिती होत आहे. वाशी पुलाचे विस्तारीकरण आणि मेट्रो फेज वनची कामे झाली आहेत. अटल सेतू प्रकल्प हा संपूर्ण जगात एक अद्भुत प्रकल्प आहे. ७६ हजार कोटी रुपये खर्चून जगातील सर्वात मोठे कंटेनर पोर्ट आणि भारतील सर्वात मोठे बंदर महाराष्ट्रातील वाढवण येथे निर्माण होत आहे. वैनगंगा जलसिंचन प्रकल्पांच्या माध्यमातून ३ लाख ७१ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असून याकरीता ८५ हजार कोटी रुपये खर्च होणार आहे. २ हजार २०० कोटी रुपयांचा खडकवासला ते फुरसुंगी ३४ किलोमीटर सुरंग बनविण्याचे



काम ही मंजूर झाले आहे.

पुणे आणि कोल्हापूर विमानतळांवर नवीन टर्मिनल बनविण्यात आले आहे. टाटा पॉवरबरोबर २ हजार ८०० मेगावॉटचा हायड्रो स्टोरेज प्रोजेक्टही विकसित करण्यात येत आहे. शिरवळ आणि भिवपुरी रायगड येथे मल्टी मॉडेल लॉजिस्टिक पार्क उभारण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या विकासाचे अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले असल्याचेही श्री. शाह यावेळी म्हणाले. ■

# पंतप्रधान अन्नदाता आय संरक्षण योजना: डाळीचे उत्पादन वाढवणार, शेतकऱ्यांकडील तूर खरेदी करणार

- महाराष्ट्र,आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणामध्ये ०.१५ लाख मेट्रिक टन तूर खरेदीचा १२,००६ शेतकऱ्यांना फायदा
- नाफेड आणि एनसीसीएफसारख्या केंद्रीय नोडल एजन्सींद्वारे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेली तूर १००% खरेदी करण्याचे केंद्राचे आश्वासन

**केंद्र** सरकारने १५ व्या वित्त आयोगाच्या कार्यकाळात २०२५-२६ पर्यंत एकात्मिक प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियान (पीएम-आशा) योजना सुरू ठेवण्यास मान्यता दिली आहे. एकात्मिक पीएम-आशा योजना खरेदी प्रक्रियेच्या अंमलबजावणीमध्ये अधिक परिणामकारकता आणण्यासाठी प्रशासित केली असून ती शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांसाठी रास्त मूल्य प्रदान करण्यात साहाय्यभूत ठरण्याबरोबरच ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत त्यांची उपलब्धता सुनिश्चित करून जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीतील अस्थिरता नियंत्रित करेल. एकात्मिक पीएम-आशा योजनेच्या मूल्य समर्थन योजनेअंतर्गत, निर्धारित उचित सरासरी गुणवत्तेनुसार (एफएक्यू) अधिसूचित डाळी, तेलबिया आणि खोबऱ्याची खरेदी केंद्रीय नोडल एजन्सी (सीएनए) कडून एमएसपीवर, राज्यस्तरीय एजन्सींद्वारे पूर्व-नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून थेट केली जाते.

डाळींचे देशांतर्गत उत्पादन वाढावे आणि आयातीवरील अवलंबित्व कमी व्हावे यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, केंद्र सरकारने २०२४-२५ या खरेदी वर्षासाठी तूर, उडीद आणि मसूर या डाळ पीक उत्पादनांची मूल्य समर्थन योजनेअंतर्गत (Price Support Scheme - PSS) अंतर्गत राज्यातील उत्पादनाच्या १००% इतक्या प्रमाणात खरेदी करण्यासाठी मंजूरी दिली आहे.

देशाला डाळींच्या बाबतीत आत्मनिर्भर बनविण्यासाठी केंद्र सरकार आपल्या केंद्रीय समन्वयक यंत्रणांच्या माध्यमातून पुढचे चार वर्ष तूर, उडीद आणि मसूर या डाळ पीक उत्पादनांची राज्यातील उत्पादनाच्या १००% प्रमाणापर्यंतची खरेदी सुरू ठेवेल, अशी घोषणाही केंद्र



सरकारने २०२५ च्या अर्थसंकल्पात केली होती.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी खरीप २०२४-२५ हंगामासाठी मूल्य समर्थन योजने अंतर्गत महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हरयाणा, कर्नाटक, मध्य प्रदेश, तेलंगणा आणि उत्तर प्रदेश या राज्यांमधून तूर खरेदीला मंजुरी दिली आहे. या अंतर्गत एकूण सुमारे १३.२२ लाख मेट्रिक टन इतक्या तुरीची खरेदी केली जाणार आहे. केंद्र सरकारच्या निर्णयानुसार महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा इथे याआधीच खरेदीला सुरूवात झाली आहे. या खरेदी अंतर्गत या सर्व राज्यांमधून एकूण १५.०२.२०२५ पर्यंत ०.१५ लाख मेट्रिक टन इतक्या तूरीची खरेदी केली गेली आहे. या सर्व राज्यांमधल्या १२,००६ शेतकऱ्यांना या खरेदीचा लाभ मिळाला आहे. इतर राज्यांमध्येही लवकरच तूरीच्या खरेदीचा प्रारंभ केला जाणार आहे. केंद्र सरकारने भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ,(नाफेड) आणि भारतीय राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (NCCF) या आपल्या समन्वयक यंत्रणांमार्फत शेतकऱ्यांनी उत्पादन घेतलेल्या तूरीची १००% खरेदी करण्यासाठी वचनबद्धता व्यक्त केली आहे. ■

# पेट्रोलपंप उभारणीसाठी प्रत्येक जिल्ह्यात 'एक खिडकी'

● महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय

- राज्यात ३० हजारांवर रोजगार निर्मिती
- दोन हजार पेट्रोल पंपांचे नियोजन
- १६६० पपांना मान्यता
- तीन महिन्यात मिळतील सर्व मान्यता

**तब्बल** ३० हजारांवर रोजगार निर्मिती करण्यासाठी विविध कारणांनी रखडलेल्या राज्यातील १६६० पेट्रोलपंपांच्या परवानग्या देण्यासाठी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात 'एक खिडकी' सुरू करण्याचा महत्वाचा निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक खिडकी सुरू करण्याची महत्त्वपूर्ण सूचना महसूल विभागाला केली आहे, असे सांगून महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले की, राज्यात मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल. एका अहवालानुसार सुमारे ३० हजारांवर रोजगानिर्मिती होऊ शकेल. त्यामुळे रोजगारवाढीची ही सूचना स्वीकारून निर्णय घेतला. पेट्रोल पंप सुरू करण्याची प्रक्रिया पुढील तीन महिन्यात पूर्ण व्हावी यादृष्टीने परवानगी देताना अत्यावश्यक आणि कमीत कमी अटी शर्ती ठेवता येतील का याबाबत आदर्श कार्यप्रणाली महसूल विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांनी तयार करावी. विभागीय आयुक्तांनी याबाबत तातडीने सूचना पाठवाव्यात.

### दोन हजार पेट्रोल पंपांचे नियोजन

राज्यात दोन हजार पेट्रोल पंप वाढविण्याचे नियोजन असून पंप उभारणीमध्ये इंधन कंपन्यांना महसूल विभागाकडील एनएसह पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभागातील विविध ना हरकत परवानगीच्या अडचणी दूर करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात एक खिडकी सुरू करण्यात येईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली इंधन कंपन्यांच्या अडचणी, समस्यांचा आढावा घेण्यात आला. महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, सह सचिव अजित देशमुख, बीपीसीएलचे सुंदर राघवन, राज्य प्रमुख राकेश सिन्हा, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार डॉ.आनंद बंग, समन्वयक संतोष निरेंदकर, एचपीसीएलचे बी.अच्युत कुमार, मुकुंद जवंजाळ आदी उपस्थित होते. ■


**रजिस्ट्रेशन ऑफ न्यूजपेपर्स (सेंट्रल)**
**नियम १९५६ या अन्वये**
**पाक्षिक 'मनोगत' संबंधी माहिती**
**फॉर्म नंबर ४ (नियम)**

**प्रकाशस्थळ :** भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

**प्रसिद्धीचा नियतकाल :** पाक्षिक

**प्रकाशक :** मुकुंद नारायण कुलकर्णी

**मुद्रक :** मुकुंद नारायण कुलकर्णी

**संपादक :** गणेश हाके

**राष्ट्रीयत्व :** भारतीय

**पत्ता :** भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई-२० येथे प्रकाशित केले. संपर्क: ०२२-२२०२२०५०

ज्या व्यक्ती वृत्तपत्राच्या मालक असतील व एकूण भांडवलाच्या १ टक्क्यापेक्षा अधिक भाग घेतलेले भागीदार किंवा भागधारक यांची नावे व पत्ते

**भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र**

भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले संपर्क : ०२२-२२०२२०५०

याद्वारे जाहीर करीत आहे की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी आहे.

**मुकुंद नारायण कुलकर्णी**
**प्रकाशक**




नवी मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या आजी-माजी नगरसेवकांचा पक्ष प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, वनमंत्री गणेश नाईक, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, संजीव नाईक, जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत आदी.





महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट सुरक्षा रक्षक आणि जनरल कामगार संघाचे नेते संजय निकम व पोपटराव पाटील तसेच राज्य गोपाळ सामाजहित महासंघाचे अध्यक्ष संजय गव्हाणे, गजानन महाजन, बालाजी घोडके, ठाणे जिल्हाध्यक्ष विजय शिंदे, उपाध्यक्ष विष्णू नवघरे, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दत्ता लोणारे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश. उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. मनोज घोरपडे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे आदी.

# वीर बाल दिनानिमित्त राज्यात झालेले कार्यक्रम









शीख धर्माचे दहावे गुरू गुरु गोविंद सिंगजी यांच्या जोरावर सिंग आणि फतेह सिंग या दोन लहान मुलांनी धर्मासाठी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. त्यांच्या शौर्याच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ डिसेंबर रोजी वीर बाल दिवस साजरा केला जातो. भारतीय जनता पार्टीतर्फे वीर बाल दिनानिमित्त महाराष्ट्रात प्रा. किरण पाटील यांच्या नेतृत्वाखाली विविध कार्यक्रम झाले.





RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




**प्रति,**

______________________

______________________

______________________

______________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com